# ४७ वी राज्य पोलीस कर्मचारी वृंद परिषद

## सभासद असलेले व सभासद नसलेले पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे व संबंधित कार्यासनाकडून प्राप्त झालेले अभिप्राय.

| अ. क्र. | शिर्षक | कर्मचारी वृंद परिषद | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ४३वी | ४४वी | ४५वी | ४६वी | ४७वी |
| १. | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | ०१ | -- | ०८ | ११ | २१ |
| २. | सभासद नसलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | -- | ०१ | -- | ०२ | ०३ |
| ३. | आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | -- | ०२ | ०१ | ०६ | -- |
| | **एकुण मुद्दे (५६)** | **०१** | **०३** | **०९** | **१९** | **२४** |

## मागील ४३ व्या राज्यस्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीत सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर माननीय अध्यक्षांनी आढावा घेऊन दिलेल्या सूचना.

| अ. क्र. | मुद्या क्रमांक सभासदाचे नांव / घटकाचे नांव | अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्ये | अध्यक्षांनी दिलेले अभिप्राय /आदेश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **मुद्दा - ६**<br><br>श्री. सु.ब. फुलारी, तत्कालिन उप संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.<br><br>(सध्या नेमणूक पोलीस अधीक्षक, सांगली)<br><br>**(का.क्र. ९)** | राज्य सुवर्ण जयंती निमित्त पदक प्रदान मिळणेसाठी शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावासंबधी पाठपुरावा करणेबाबत. | शासनासोबत बैठक घेवून निर्णय घेण्यात येईल, असे अध्यक्षांनी सांगितले. | **प्रस्तुत प्रकरणी मा. मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करुन, शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल.** | शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक डीपीपी-२०१२ / प्र.क्र.१०/पोल-१०, दिनांक १२.०५.२०१५ अन्वये (१४ पैकी शासन निर्णय क्रमांक १३) फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने, उत्कृष्ट कामाला प्रोत्साहन देण्याकरिता "मुख्यमंत्री पदक" देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. | **चर्चेनंतर सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

## मागील ४४ व्या राज्यस्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीत सभासद नसलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर माननीय अध्यक्षांनी आढावा घेऊन दिलेल्या सूचना.

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव/घटकाचे नांव | सभासद नसलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुद्दा क्र. ७<br><br>श्री. प्रविण कुमार पडवळ, पोलीस अधीक्षक, नाशिक<br><br>का.क्र.३२ | पोलीस खात्यातील बहुतेक पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांनी शासनाचे गट विमा योजना (जी.आय.एस.) योजनेंतर्गत गृह कर्ज घेतले आहे. सदर गृह कर्जाची वसूली त्यांच्या वेतनातून दरमहा होत असतांना देखील व बहुतेक वेळा गृह कर्जाचे हप्ते संपूर्ण फेडले जातात, अशा वेळी कर्मचारी हे शासनाचे वस्त्रोद्योग खात्यात कर्ज फेडलेचा निरंक दाखला मागण्यास गेले असता, त्यांना कर्जाचे हप्ते थकीत असल्यामुळे सदरचे दाखले दिले जात नाही, त्यामुळे कर्मचाऱ्यांना मानसिक धक्का बसुन, परत नव्याने हप्ते वसूली बाबत ट्रेझरी व्हावचर नंबर मिळणेकामी कोषागार कार्यालय किंवा संबधित कार्यालयास पायपीट करावी लागते. त्यासाठी जी. पी. एफ्. प्रमाणे पावती मिळावी अशी पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीमध्ये मुद्दा उपस्थित केला आहे.<br>सदरचा प्रकार टाळण्यासाठी ज्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांनी **जी.आय.एस. योजनेंतर्गत गृह कर्ज घेतले, त्या कर्मचाऱ्यांना, ज्या प्रमाणे जी.पी.एफ. ची पावती मिळते, त्याप्रमाणे सदर कर्मचारी यांना दर वर्षाला गृह कर्ज घेतले, किती रक्कम वसूल होणे शिल्लक आहे किती कर्ज फेडले याची माहिती मिळावी म्हणून जी.पी.एफ. प्रमाणे पावती मिळणेकामी शासनाच्या सहकार व वस्त्रोद्योग, खात्यास लिहून जाणेस विनंती आहे.** तसेच कपातीच्या तपशीलासह पावत्या मिळाव्यात ही विनंती. | सदर बाबत संबंधीत कार्यासनाकडे अभिप्राय मागविण्यात येतील. | सदर बाबतीत वस्त्रोद्योग खात्याच्या परवांनगीची आवश्यकता का आहे, अशी विचारणा अध्यक्षांनी केली. सदर कर्ज वसुलीच्या हप्त्याची नोंद वेतन पावतीवर होत असल्याने अशा दाखल्याच्या परवानगीची आवश्यकता नसल्याचे मत अध्यक्षांनी व्यक्त केले. याप्रकरणी वित्त विभाग, तसेच लेखा व कोषागरे यांच्यासमवेत संयुक्तिक बैठक घेण्यात येईल व अडचण दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल. | सदर प्रकरणी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय यांच्याकडून या कार्यालयाचे पत्र क्रमांक पोमसं/३२/लेशा/गटविमा योजना/गृहकर्ज/२०१५, दिनांक ०४.१२.२०१४ अन्वये माहिती मागविण्यात आली आहे. त्यावर स्मरणपत्रे पाठविण्यात आलेली आहेत. सदरची माहिती प्राप्त होताच सादर केली जाईल. | **चर्चेनंतर सदर मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

# मागील ४४ व्या राज्यस्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीत सभासद असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेल्या मुद्यांवर अध्यक्षांनी आढावा घेऊन दिलेल्या सूचना.

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव/घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **मुद्दा क्र. १**<br><br>श्री. फुलारी, तत्कालिन संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक<br><br>(सध्या नेमणूक-पोलीस अधीक्षक, सांगली)<br><br>**का.क्र.३०** | पोलीस निरीक्षक, सहायक पोलीस आयुक्त, अपर पोलीस अधीक्षकांच्या वेतनात तफावत दिसून येत आहे. महसुल, विक्रीकर विभाग, मंत्रालय या खात्यांशी तुलना करता वेतनाबाबत तफावत दिसून येते. त्याबाबत शासनास अहवाल सादर करण्यात आलेला आहे. वेतन सेवेच्या पाच सहा वर्षांनंतर अपर जिल्हाधिकारी यांचे वेतन पोलीस अधीक्षक यांचेपेक्षाही जास्त झालेले आहे | **प्रस्तुत प्रकरणी अध्यक्षांनी श्री.फुलारी, तेव्हाचे पोलीस उप आयुक्त, नाशिक यांना चर्चा करण्यास सांगितले आहे.** | याबाबत शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आलेला असून, सदर मुद्दा वेतन त्रुटी कमिटीसमोर मांडण्यात येईल. तसेच सदरचा प्रस्ताव मा. मुख्यमंत्री महोदयांच्याही निर्दशनास आणण्यात येईल. | प्रस्तुत मुद्यांनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्य सेवेमध्ये [पोलीस उप अधीक्षक दर्जा] निवड झाल्यानंतर पोलीस व इतर सर्व खात्यांसाठी प्रवेश टप्प्यावर [Entry Level] वेतन श्रेणी व ग्रेड पे एकाच दर्जाचे असले तरी (उपजिल्हा अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी इत्यादी विभागाच्या तुलनेत पोलीस विभागात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना कमी ग्रेड पे मिळत असल्याबाबत शासनास या कार्यालयाचे पत्र क्रमांक पोमसं/३०/पगारवाढ/नाशिक/ २६०/२०१३, दिनांक २४.०२.२०१४ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. शासनाने त्या अनुषंगाने उपस्थित केलल्या मुद्यांचा वेळोवेळी शासनास खुलासा/अहवाल देण्यात आलेला आहे. याबाबत दिनांक ३०.०६.२०१५, दिनांक १७.०८.२०१५, दिनांक ०४.१२.२०१५ आणि अ.शा. पत्र दिनांक १२.१०.२०१५ अन्वये शासनास विनंत्या करण्यात आलेल्या आहेत. याबाबत शासनाचे आदेश अद्याप प्रलंबित आहेत. | प्रस्तुत प्रकरणी इतर विभागांशी तुलना करण्याची आवश्यकता नसल्याचे मा.अध्यक्षांनी निर्देश दिले आहेत. **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

**मागील ४४ व्या राज्यस्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीत सभासद असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेल्या मुद्यांवर अध्यक्षांनी आढावा घेऊन दिलेल्या सूचना.**

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव/घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | **मुद्दा क्र. ५**<br><br>श्री. संपत महादेव जाधव, पोह/४९५१, विमानतळ पोलीस ठाणे, पुणे शहर<br><br>**का.क्र.३०** | ४२ व्या वृद परिषदेच्या वेळी हा मुद्या चर्चिला गेला होता की, व्हीआयपी दौरे, बॉम्ब स्फोट ह्यावेळी सर्व सुट्टया बंद होतात. त्याबद्दल काहीच मोबदला मिळत नाही. त्याबाबत शासनाकडे पत्रव्यवहार झालेला आहे. त्यानंतर वृंद परिषदेच्या ३ बैठका झालेल्या आहेत. त्याची सद्यःस्थिती काय आहे. पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या दिवाळी, दसरा, व गणपती यावेळी ३५ टक्के लोकांच्या साप्ताहिक सुट्टयां बंद होतात. परंतु जिल्हाधिकारी कार्यालयातील लोकांना निवडणुकी दरम्यान एक दिवसांचे मानधन दिले जाते. त्याप्रमाणे पोलीसांनाही मिळावे. विकली ऑफ मिळतो पंरतू तो फार अल्प आहे. तरी साप्ताहिक सुट्टीच्या मोबदल्यात एक दिवसाचे वेतन मिळावे. | शासनास प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.<br>सदर मुद्याबाबत संबंधीत कार्यासनाने शासनाकडे पाठपुरावा करावा. | सदर मुद्यांबाबत आस्थापना शाखेकडून साप्ताहिक सुट्टया बंद न करण्याविषयीचे आदेश /परिपत्रक निर्गमित करावेत. व्हीआयपी दौरे, बॉम्बस्फोट व सणांच्या कालावधीत अतिरिक्त मनुषबळ उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे साप्ताहिक सुट्टी बंद करण्यात येवू नयेत, याकरिता देण्यात येणारे मानधन फार पूर्वी / मागील काळातच निश्चित करण्यात आलेले असल्याने सदर मानधनात बदल करण्याची आवश्यकता आहे. याबाबत प्रकरणी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या निर्दशनास आणण्यांत येईल. | गृह विभाग, शासन निर्णय क्र. पीएए-०३९८ / प्र.क्र. ८५ / पोल-५ अ, दिनांक ०६.०८.२०१५ नुसार पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना साप्ताहिक सुट्टीच्या मोबदल्यात एका दिवसाचे वेतन दैनिक भत्ता म्हणून एका कॅलेंडर वर्षात ८ दिवसाच्या किमान मर्यादेपर्यंत मंजूर करण्यात आला आहे. | **कार्यवाही पूर्ण**<br>**झाल्याने सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

## ४५ व्या राज्य पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीसाठी सभासद असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर मा. अध्यक्षांनी आढावा घेवून दिलेल्या सूचना.

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव/घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १ | **मुद्दा क्र. ७**<br>श्री. विजयकुमार वि. पल्लेवार, पोलीस निरीक्षक, दहशतवाद विरोधी पथक, मुंबई<br>**का.क्र. २, ३-अ, ५-अ, ६** | **बिनतारी संदेश विभागातील रिक्त पदे तातडीने भरले जाणेबाबत** :- मा.हुजूरांचे स्थाई आदेश क्र. २१/२०१३, दिनांक २१/०२/२०१३ अन्वये बिनतारी संदेश विभागाकडे पोलीस दलाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाचे काम अतिरीक्तपणे सोपाविण्यात आलेले आहे.<br>सन २००५ नंतर बिनतारी संदेश विभागातील रिक्त पदांसाठी कोणतीही भरती प्रक्रिया झालेली नाही, किंवा पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाच्या विविध टप्प्यांत आवश्यक प्रमाणात नवीन पदे निर्माण झालेली नाहीत.<br>सन १९८९ साली फक्त पोलीस अधीक्षक व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या वाहनांना बिनतारी यंत्रणा होती. परंतु आज बहुतेक पोलीस शिपायांकडे देखील वॅाकीटॅाकी यंत्रणा आहे. यावरुनच बिनतारी संदेश यंत्रणेची वाढलेली व्याप्ती लक्षात येते. परंतु, सन १९८९ साली एखाद्या घटकास उपलब्ध असलेल्या बिनतारी संदेश मनुष्यबळाच्या अंदाजे सरासरी ४० ते ५० टक्के मनुष्यबळ आज उपलब्ध आहे. परिणामी उपलब्ध मनुष्यबळावर रिक्त पदामुळे कामाचा ताण वाढलेला आहे. त्यातून पोलीस दलाची नोकरी सोडून इतर खात्यात जाणे, स्वेच्छानिवृत्ती घेणे असे प्रकार घडत आहेत.<br>करिता मा. हुजूरांनी उपरोक्त स्थाई आदेशांप्रमाणे ठरवून दिलेले उद्दिष्ट परिपूर्ण साध्य करण्यासाठी रिक्त पदे लवकरात लवकर भरण्याबाबतची कार्यवाही होणेस विनंती आहे, जेणेकरुन उपलब्ध मनुष्यबळावरील कामाचा ताण कमी होऊन समतोल राखला जाईल. | सदर मुद्दयाबाबत संबधीत कार्यासनाने शासनाकडे पाठपुरावा करावा. | **का.क्र.६ :-** शासन, गृह विभाग आदेश क्रमांक PWD - ०५१५/प्र.क्र. ४०८/पोल-४, दिनांक ०१.१२.२०१५ अन्वये पोलीस बिनतारी संदेश विभागातील सहायक पोलीस उपनिरीक्षक (रे.यं.)-१९१, पोहवा (बि.यं.चा.)-४३२, पोहवा (विजतंत्री)-५२ व पोशि (कर्मशाळा मदतनीस)-५३ अशी एकुण ७२८ पदे भरण्यास शासनाने परवानगी दिली आहे. त्यानुसार दिनांक १७.१२.२०१५ रोजीचे दैनिक सकाळ, लोकमत, व टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात या पद भरतीची जाहिरात प्रसिध्द झालेली आहे. | रिक्त असलेली पदे भरण्यास शासनाने परवानगी दिलेली असल्याने, प्रस्तुत प्रकरणी संचालक व अपर पोलीस महासंचालक, बिनतारी संदेश विभाग, पुणे यांना आयटीआय शी संपर्क साधून सदरची रिक्त पदे भरण्याबाबत, आवश्यक ती कार्यवाही करण्यात बाबत सूचित करुन, **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव/घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | मा.अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधित कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| २ | **मुद्दा क्र. ८**<br><br>श्री. विजयकुमार वि. पल्लेवार, पोलीस निरीक्षक, दहशतवाद विरोधी पथक, मुंबई<br><br>**का.क्र. ३०** | **दहशतवाद विरोधी पथकाकडील अंमलदारांना दिल्या जाणाऱ्या आतिरिक्त वेतनाबाबत** :- दहशतवाद विरोधी पथकाकडील अंमलदारांना ५ व्या वेतन आयोगाद्वारे मूळ वेतन, अधिक ग्रेड वेतन, अधिक महागाई भत्ता यांच्या ५० टक्के प्रोत्साहनपर भत्त्याची तरतूद वगळण्यात आली आहे.<br>दहशतवाद विरोधी पथकाकडील कर्तव्याची जोखीम व स्वरुप विचारात घेता ५व्या वेतन आयोगाच्या शिफारशींप्रमाणे प्रोत्साहनपर भत्ता देणे गरजेचे वाटते. नक्षलग्रस्त भागातील पोलीस अंमलदारांना आता अशाप्रकारे प्रोत्साहनपर भत्त्याची तरतूद करण्यात आलेली आहे.<br>त्याचप्रमाणे, दहशतवाद विरोधी पथकाकडील अंमलदारांना देखील मूळ वेतन, अधिक ग्रेड वेतन याच्या ५० टक्क्याबरोबर महागाई भत्त्याच्या ५० टक्के रक्कम देखील प्रोत्साहन भत्ता म्हणुन अंतर्भुत केली जाण्याबाबत शासनाकडे लिखाण /पाठपुरावा करण्याबाबत विचार व्हावा. | प्रस्तुत प्रकरणी संबधीत कार्यासनाने शासनाकडे पाठपुरावा करावा. | दहशतवाद विरोधी पथकातील कार्यरत पोलीस अधिकारी / अंमलदारांना देण्यात येणाऱ्या ५०% अतिरिक्त प्रोत्साहन भत्यावर प्रचलित दराने महागाई भत्ता देण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्रमांक पोमसं/३०/द.वि.प./उत्तेजनार्थ योजना/८५-२०१०, दिनांक १९.०७.२०१३ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणी शासनाचे आदेश अद्याप प्रलंबित आहेत. | **चर्चेनंतर अध्यक्षांनी दिलेल्या आदेशनुसार सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव/घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ३ | **मुद्दा क्र. ९**<br>श्री. बाबुराव वानखेडे, पोलीस शिपाई क्र.१७९३/अकोला<br>**का.क्र. ३०** | वेतन नियम - २००९ (सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे) सन २००२ ते २००५ यावर्षी भरती झालेल्या कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/०१/२००६ रोजी वेतन निश्चिती करण्यात आलेली आहे. सन २००६ मध्ये भरती झालेल्या कर्मचाऱ्यांपेक्षा सन २००२ ते २००५ मध्ये भरती झालेल्या वरिष्ठ कर्मचाऱ्यांचे वेतन निश्चिती कमी होत असल्याने त्यांचेवर अन्याय होत आहे. सोबत, दिनांक ०६/०१/२००६ चे पत्र जोडलेले आहे. सदरचा प्रस्ताव कृपया वेतन त्रुटी समितीकडे सादर करावा, जेणेकरुन वरिष्ठ व कनिष्ठ कर्मचाऱ्यांचे वेतनामधील तफावत दूर होईल. | सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून, त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. सदर प्रस्ताव वेतन त्रुटी समितीसमोर ठेवण्याबाबत वरिष्ठ पातळीवर शासनाकडे पाठपुरावा करावा लागेल. तसेच सदर प्रस्ताव मा. मुख्यमंत्री महोदयांच्या निर्दशनास आणण्यांत येईल. | महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, अधिसूचना दिनांक २२.०४.२००९ मधील नियम ७ टिप ५ पोटनियम (१) अन्वये वेतन निश्चित करतांना, जो शासकीय कर्मचारी, १ जानेवारी, २००६ च्या लगतपुर्वी, त्याच संवर्गातील आपल्या कनिष्ठ शासकीय कर्मचाऱ्यांपेक्षा विद्यमान श्रेणीत कमी वेतन घेत असेल तर, **त्याबाबतीत त्यांचे वेतन कनिष्ठ कर्मचाऱ्यांच्या वेतनापर्यंत वाढविण्यात येईल. असे स्पष्ट केलेले आहे. त्यामुळे सदरचा मुद्दा निकाली काढण्यास हरकत नसावी.**<br>तरी देखील या अनुषंगाने शासनास या कार्यालयाचे क्रमांक पोमसं/३०/वेतनत्रुटी/६४/२०१३, दिनांक ३१.०८.२०१३ अन्वये योग्य ते मार्गदर्शन मिळावे म्हणून विनंती करण्यात आली होती. त्यावर शासन पत्र गृह विभाग, क्रमांक पोलीस-१२१३/प्र.क्र.५५१/पोल-५ अ, दिनांक २४.१०.२०१३ नुसार संदर्भाधिन विषयाच्या अनुषंगाने वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३०९/ सेवा-३, दिनांक १७.१०.२०१३ अन्वये दिनांक ०१ जानेवारी, २००६ पूर्वी व त्यानंतर शासन सेवेत नियुक्त झालेले कर्मचारी यांच्या वेतनसंरचनेतील तफावत दूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून त्यावर निर्णय झाल्यावर अवगत करण्यात येईल, असे कळविले आहे. त्यावर शासनास दिनांक ०४.१२.२०१४, दिनांक २४.०३.२०१५ व ०५.१२.२०१५ अन्वये विनंत्या करण्यात आल्या असून अद्याप त्यावर शासनाचे आदेश प्राप्त झालेले नाहीत. | प्रस्तुत प्रकरणी वेतनसंरचनेतील तफावत दूर करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव/घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ४ | **मुद्दा क्र. १३**<br>श्री. संपत महादेव जाधव, पोह/.४९५१, विमानतळ पोलीस ठाणे, पुणे शहर<br><br>**का.क्र. ९** | पोलीस दलामध्ये उत्कृष्ठ काम करणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलीस महासंचालक यांचेकडून देण्यात येणारे सन्मानचिन्ह, पोलीस पदक, राष्ट्रपतींकडून देण्यात येणारे पोलीस पदक, तसेच शौर्य पदके बहाल केली जातात. सदरची पदके बहाल करताना सध्या सन्मानचिन्हांचे मानकरी यांना फक्त सन्मानचिन्हं देण्यात येते. सन्मानचिन्हाबरोबर अधिकारी व कर्मचाऱ्यांना मा. पोलीस महासंचालक यांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत विनंती करीत आहोत. यापुर्वी ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सन्मानचिन्हं मिळाले आहे. त्यांनासुध्दा प्रमाणपत्र मिळण्याबाबत विनंती करीत आहोत. तसेच, वरील सर्व पदके बहाल करताना अधिकारी व कर्मचाऱ्यांना बक्षिस या रुपाने काही रक्कम देण्यात यावी. सदरची रक्कम शासनाकडून न मिळाल्यास संबंधीत पोलीस कल्याण निधीचे गटप्रमुखाने ती जाहिर करुन देण्यात यावी. तसेच, राष्ट्रपती, पोलीस पदक व शौर्यपदक ज्या पोलीस कर्मचाऱ्यांना बहाल केली जातील, त्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना पीएम्टी, एस्टी व रेल्वे प्रवास सवालतींच्या दरांमध्ये उपलब्ध होणेकामी शासनाशी पत्रव्यवहार होणेस विनंती आहे. | **प्रस्तूत प्रकरणी संबधीत कार्यासनाने शासनाकडे पाठपुरावा करावा.** | पूर्वीच्या सन्मानचिन्ह धारकांना प्रमाणपत्र द्यावयाचे झाल्यास ते १९९२ पासूनच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना द्यावे लागेल. त्यामुळे अशाप्रकारे २०११ पूर्वीच्या सन्मानचिन्ह धारक पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्र देणे व्यवहार्य ठरणार नाही.<br>तसेच बक्षिसाबाबत मा. अध्यक्षांनी कोणतेही निर्देश दिलेले नाहीत. तथापि, विविध पदक धारक तसेच सन्मानचिन्ह धारकांना अतिरिक्त सवलती मंजूर करण्याबाबत शासनाशी पत्रव्यवहार सुरु असून, अंतिम निर्णय झालेला नाही. | मा.अध्यक्षांनी सन्मानचिन्ह धारकांना फक्त प्रशस्तीपत्र प्रदान करण्याबाबत सूचित करुन, **सदरचा मुद्दा निकाली काढला आहे .** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव/घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ५ | **मुद्दा क्र. १९** श्री. पी. पी. डोईजड, असई/४४५, रा.रा.पो. बल, गट क्र. ५, दौंड **का.क्र. २८(अ)** | कंपनी मेस करिता लागणारे गॅस सिलेंडर सबसिडीच्या सवलतीने मिळावे, सबसिडी सवलतीने गॅस सिलेंडर मिळत नसल्याने अतिरिक्त रक्कम भरावी लागते. तरी ते गॅस सिलेंडर सवलतीच्या दराने मिळावे. | प्रस्तूत प्रकरणी संबधीत कार्यासनाने अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे पाठपुरावा करावा. | भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांचे परिपत्रक क्रमांक NT/LPG/Circular/९०/२०१५-२०१२-२०१३, दिनांक २७.०९.२०१२ अन्वये गॅस वितरणाचे निकष ठरविण्यात आले आहेत. त्याप्रमाणे सरकारी मेस, दवाखाना मेस आणि केंद्रीय राखीव पोलीस बलांना सुध्दा 'नॉन सबसिडी दराने' गॅस सिलेंडर्स देण्यात येत आहेत. त्याबाबत अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे पाठपुरावा केला असता, त्यांनीसुध्दा केंद्रीय राखीव पोलीस बल तसेच, सैन्य दल यांच्या कार्यालयाशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून ते खरेदी करीत असलेले गॅस सिलेंडर हे सबसिडीसह खरेदी करतात किंवा कसे? याबाबत चौकशी केली असता, ते खरेदी करीत असलेले गॅस सिलेंडर हे सबसिडीसह खरेदी करीत नसल्याचे अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अवगत झाल्याचे, अपर पोलीस महासंचालक यांनी त्यांचे दिनांक ०३.०१.२०१५ च्या पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे. त्यानुसार राज्य राखीव पोलीस बलातील कंपनी मेसकरीता अतिरिक्त गॅस सिलेंडर सबसिडी दराने उपलब्ध होण्याबाबत सर्व गॅस पुरवठा व वितरण एजन्सी, तसेच, पेट्रोलियम मंत्रालयाशी पत्रव्यवहार करणे उचित होणार नाही, असे पोलीस महासंचालक यांचे आदेश घेवून त्याप्रमाणे समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ५ व ७, दौंड यांना कार्यालयीन क्रमांक पोमसं/२८-अ/४९३७/गॅस सिलेंडर/गट ७, दौंड / ६९ / २०१३, दिनांक २०.०२.२०१५ च्या ज्ञापान्व्ये कळविण्यात आले आहे **(मुद्दा निकाली काढण्यात येईल.)** | प्रस्तुत प्रकरणी सर्व घटक प्रमुखांना व सर्व पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांनी एल.पी.जी. गॅस सिलेंडरची सबसिडी सवलतीने न घेण्याबाबत, तसेच ती स्वेच्छेने परत करण्याविषयी मा.अध्यक्षांनी सूचित करून, याबाबत घटक प्रमुखांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास पाठविण्याविषयी निर्देश देवून, **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव/घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ६ | **मुद्दा क्र. २०**<br>श्री.पी.पी. डोईजड, असई/४४५, रारापो बल, गट क्र. ५, दौंड<br>**का.क्र. २७(ब)** | राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ५ व ७, तसेच इतर गटातील बॅचलर लाईन सन १९६७-६८ दरम्यानच्या कालावधीत बांधण्यात आलेल्या असून सदर इमारती पाडून त्याजागी नव्याने इमारती बांधण्यात याव्यात. | **रा.रा.पो.बल गट क्र.५ व ७ येथे टप्प्याटप्प्याने इमारती बांधण्याचे काम सुरु आहे. रा.रा.पो.बल गट क्र.४ नागपूर येथे अडचण येत असल्याचे मा. अध्यक्षांनी सांगितले.** | राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ५ व ७, दौंड येथे टप्प्याटप्प्याने इमारती बांधण्याचे काम सुरु आहे.<br>समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ४, नागपूर यांनी नव्याने इमारती बांधण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याची तजवीज ठेवली आहे, असे दिनांक १४.०७.२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे. | नव्याने इमारती बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत मा.अध्यक्षांनी सूचित केले आहे. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव/घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ७ | **मुद्दा क्र. २१**<br>श्री. एच्. एस्. काटकर, सफौ, सातारा.<br><br>**का.क्र. ३०** | **ॲन्टी करप्शन ब्युरो शाखेतील कामकाजाबाबत.**<br>महाराष्ट्र राज्यातील ॲन्टी करप्शन ब्युरोमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कामकाजाबाबत, तसेच त्यांचे कल्याणाबाबत सर्वस्वी निर्णय घेण्याचे अधिकार महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारित आहेत. वास्तविक या विभागांमध्ये काम करणारे कर्मचारी हे क्लिष्ट स्वरुपाचे काम करीत आहेत. तसेच, त्यांना अविरतपणे शासनाचे इतर विभागांमध्ये काम करणारे अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द काम करावे लागते. त्यामुळे एक अपराधीपणाची भावना सतत वागवित हे अधिकारी / कर्मचारी काम करत असतात. तसेच, हे काम तांत्रिक स्वरुपाचे असते, यामध्ये लोक सेवकांच्या मालमत्तेची गुप्त चौकशी / उघड चौकशी इत्यादि बाबींचा समावेश होतो. त्या चौकश्यांमध्ये, लोक सेवकांची बँक खाती, मालमत्तेची सांख्यिकी माहिती, विमा योजना इत्यादि स्थावर व जंगम मालमत्तेची सांख्यिकी माहिती गोळा करुन त्याचा आलेख तयार करुन उत्पन्न, मालमत्ता, खर्च इत्यादींचा ताळमेळ लावून त्यामध्ये अपसंपदेच्या अपराधापर्यंत पोहोचून त्यावरुन त्यासंबंधीत लोक सेवकांवर गुन्हा दाखल केला जातो. या सर्व प्रक्रियेमध्ये कामकाज संगणकावर केले जाते, त्यामुळे यामध्ये तांत्रिक बाबींचा समावेश होतो. हे काम या शाखेतील कर्मचारी प्रामाणिकपणे हा विभाग स्थापन झाल्यापासून करीत आहेत. वरील सर्व कामकाज शासनाचे सर्व विभागांमधील काम करणारे अधिकारी / कर्मचाऱ्यांची या विभागातील काम करणारे अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या विषयी झालेली वाईट भावना या सर्वांचा विचार करता, या शाखेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना विशेष मानधन देणे उचित आहे, अथवा दीडपट पगार देण्याबाबत शासनाने विचार व्हावा, अन्यथा भविष्यात या विभागामध्ये काम करण्याकरिता कर्मचारी मिळणार नाहीत, व शासनापुढे सध्या भेडसावत असलेला अत्यंत महत्त्वाच्या भ्रष्टाचार हा विषय असाच अनुत्तरीत राहील. या विभागामध्ये काम करणाऱ्या सहायक पोलीस निरीक्षक या पदापासून वर सर्व पदांकरिता एकटप्पा पदोन्नती व दीडपट पगार ही सुविधा पुरविली जात आहे. हीच कार्यपध्दती या शाखेमध्ये काम करणारे पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदांकरिता का अवलंबिली नाही. वास्तविक मोठ्या शहरांतील कामकाज वगळता, या शाखेतील सर्व कामकाज त्या-त्या युनिटला काम करणारी पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जाचे पोलीस कर्मचारी करीत आहेत. | प्रस्तुत प्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने सन २०१० -११ मध्ये शासनास परस्पर प्रस्ताव सादर केलेला आहे.<br>याबाबत संबधीत कार्यासनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सदर प्रस्तावाविषयीची माहिती घ्यावी. | लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील कर्मचाऱ्यांना (सहा.पो.उपनिरीक्षक ते पोलीस शिपाई) प्रोत्साहनात्मक एक टप्पा पदोन्नती किंवा अतिरिक्त ५०% दराने (दिडपट) वेतन मंजूर करण्याबाबत या कार्यालयामार्फत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. | प्रस्तुत प्रकरणी शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा, असे मा.अध्यक्षांनी सूचित केले आहे. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव/घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ८ | **मुद्दा क्र. २५**<br>श्री. व्ही. एन्. मोहिते, पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभाग, पुणे<br><br>**का.क्र.२७ (ब)** | नौका कर्मशाळा, ठाणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलीस आयुक्त, ठाणे यांचेकडून शासकीय ५ निवासस्थाने पुरविली आहेत. सदरची निवासस्थाने अपुरी पडत आहेत. पोलीस आयुक्तालय, ठाणेकरिता नव्याने बांधण्यात आलेल्या निवासस्थानातून ५ निवासस्थाने नौका कर्मशाळा, ठाणे येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी पुरविण्यात यावी.<br>**पोलीस अधीक्षक (प्रशासन), मोटार परिवहन विभाग यांचे अभिप्राय :-** पोलीस आयुक्त, ठाणे यांनी नौका कर्मशाळा, ठाणे येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांना आणखी ५ निवासस्थाने पुरविण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, हि विनंती. | पोलीस नियमावलीनुसार नौका कर्मशाळा, ठाणे येथील कर्मचारी पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर नाहीत, हे म्हणणे/धोरण चुकीचे आहे. कारण, हया कर्मचाऱ्यांचे कार्यक्षेत्र ठाणे घटकांतर्गत येते. त्यामुळे नौका कर्मशाळा, ठाणे येथील पोलीस अधिकारी/कर्मचा-ऱ्यांचे निवासस्थान पुरविण्याबाबतचे अर्ज ठाणे आयुक्तालयाच्या प्रतिक्षायादीवर घेवून, त्यांनादेखील शासकीय निवासस्थान वाटप केले पाहिजेत, असे अध्यक्षांनी निर्देश दिले आहेत. | पोलीस उप अधीक्षक, पोलीस नौका विभाग, ठाणे यांनी क्रमांक उपअधि / नौका / २६६ / २०१५, दिनांक १९.०५.२०१५ चे पत्रान्वये नौका कर्मशाळेच्या आस्थापनेवरील एकूण ०४ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थान मिळण्याबाबत पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांना विनंती केली आहे.<br>पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांनी नौका कर्मशाळेच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे एकुण ०४ विनंती अर्ज प्रतिक्षा यादीवर घेतले असून प्रतिक्षा यादीनुसार वाटप करण्यात येईल, असे पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांनी क्रमांक ठाआ / १७४ / ईशा / शानि / नौका / ६१४ / २०१५, दिनांक २९.०५.२०१५ चे पत्रान्वये कळविले आहे. | **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

## ४५ व्या राज्य पोलीस कर्मचारी वृंद परिषदच्या बैठकीमध्ये आयत्यावेळी सभासद असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर मा. अध्यक्षांनी आढावा घेवून दिलेल्या सूचना.

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव/घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. विजयकुमार वि. पल्लेवार, पोलीस निरीक्षक, दहशतवाद विरोधी पथक, मुंबई **का.क्र.१९** | पोलीस उप अधीक्षक व त्यावरील दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांना टेलिफोनची सुविधा आहे. पोलीस निरीक्षकांनादेखील टेलिफोन-इंटरनेटची सोय/तरतूद उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. | सदर मुद्दा संबंधीत कार्यासनाने लवकरात-लवकर निकाली काढण्याबाबतची कार्यवाही करावी. | शासन निर्णय क्र. टीएलसी/०५४०/प्र.क्र.९०/पोल-४, दिनांक ०५.०६.२००८ व समक्रमांकित, दिनांक २०.०६.२००८ चे शुध्दीपत्रक अन्वये राज्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व त्यावरील दर्जाच्या एकूण १३८७ अधिकाऱ्यांना कार्यालयनिहाय भ्रमणध्वनी (मोबाईल) Closed User Group सुविधेसह मंजुरी प्रदान केली आहे. सदर शासन निर्णयात मर्यादित वापर गटाचा (CUG) एक घटक तयार करुन या घटकासाठी सेवा प्राप्त करुन घेण्यासाठी ज्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी मर्यादित वापर गटामधील (CUG) व विशिष्ट सीरीजचे फोन नंबर असलेले कॉल नि:शुल्क असतील अशी एक अट नमूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही. पोलीस विभागामध्ये सन २००८ नंतर नवीन जिल्हे / विभाग तसेच, नवीन पदांची निर्मिती झाली आहे व काही पदांना श्रेणीवाढ देण्यात आली आहे. तसेच, भविष्यात निर्माण होणाऱ्या पदांकरिता ही योजना लागू होईल. त्यामुळे मर्यादित वापर गटाचा (CUG) सुविधेकरिता पोलीस महासंचालक ते सहा. पोलीस उपमहानिरीक्षक, पोलीस आयुक्त ते पोलीस उप आयुक्त / जिल्हा पोलीस अधीक्षक ते पोलीस उप अधीक्षक / उप वि. पोलीस अधिकारी, जिल्हा पोलीस ठाण्यातील प्रभारी पोलीस अधिकारी असे एकूण १८३६ पदांकरिता ही योजना लागू करुन मंजूरी देण्याबाबत या कार्यालयाचे दिनांक ३१.०८.२०१५ च्या पत्रान्वये शाासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. शासन मंजूरी अद्याप प्राप्त झालेली नाही. | प्रस्तुत प्रकरणी पोलीस निरीक्षकांना देखील टेलिफोन सुविधेची प्रतिपूर्ती मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत मा.अध्यक्षांनी निर्देश दिले आहेत. |

# ४६व्या राज्यस्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेसाठी सभासद असलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर मा. अध्यक्षांनी आढावा घेवून दिलेल्या सूचना.

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १. | **मुद्दा क्रमांक १ :-** **श्री.राजेश प्रधान, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण** <br><br> (का. क्र.३०) | पोलीस दलातील पोलीस नाईक ते पोलीस हवालदार या पदोन्नतीमध्ये वेतनवाढ बॅन्ड ५२००-२०२००, ग्रेड पे २४००, असे समान वेतन देण्यात येते. पोलीस नाईक ते पोलीस हवालदार या पदावर पदोन्नती झाल्यावर ग्रेड पे मध्ये किंवा कोणतीही वेतनवाढ न देता पदोन्नती दिली जाते. इतर शासकीय खात्यामध्ये वरिष्ठ लिपिक यांचा ग्रेड पे २४०० वरुन २८०० करण्यात आला आहे. परंतु पोलीस हवालदार यांना देण्यात येणारी पदोन्नतीनुसार वेतनवाढ व ग्रेड पे मध्ये वाढ करण्यात येत नाही. तसेच, पोलीस हवालदार ते सहायक पोलीस उप निरीक्षकांच्या पदोन्नती झाल्यावर त्यांचे विशेष वेतन रुपये ५०० कपात करण्यात येते, त्यामुळे त्यांना मिळणाऱ्या वेतनवाढीमध्ये फारसा फरक मिळत नाही. | प्रस्तुत प्रकरणी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव वेतन त्रुटी समितीसमोर ठेवण्याविषयी पाठपुरावा करावा. <br> तसेच, सदर प्रस्ताव मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणण्यात येईल. | पोलीस विभागातील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदांवर कार्यरत असलेल्या कर्मचायांना ६व्या वेतन आयोगाप्रमाणे मिळत असलेल्या ग्रेड पे मध्ये खालील नमूद केल्याप्रमाण`सुधारणा करुन मिळण्याबाबत शासनास या कार्यालयाचे पत्र क्रमांक पोमसं/३०/८८/सहावे वेतन/३३१/०८, दि.२५.१०.२०११ नुसार प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणी ०२.०२.२०१२, १९.०६.२०१२, १०.०७.२०१२, १६.०८.२०१२, २५.०९.२०१२, २०.१०.२०१२, ११.१२.२०१२, ०४.०५.२०१३, २४.१०.२०१३, १३.११.२०१३, २२.०१.२०१४,०३.०४.२०१४, ०७.०८.२०१४ नुसार शासनास वेळोवेळी विनंत्या करण्यात आलेल्या असून अद्याप त्यावरील शासन आदेश प्रलंबित आहेत. <br><br> **पद** / **सध्याचा ग्रेड पे** / **प्रस्तावित ग्रेड पे** / **पद** / **सध्याचा ग्रेड पे** / **प्रस्तावित ग्रेड पे** <br> ASI / २८००/- / ३०००/- / HC / २४००/- / २८००/- <br> PN / २४००/- / २६००/- / PC / २०००/- / २४००/- <br><br> प्रस्तुत प्रकरणी शासनाने दिनांक २५.०८.२०१५ च्या पत्रान्वये "पदोन्नतीच्या आणि निम्न पदाच्या वेतन संरचनेमध्ये फरक ठेवण्यासाठी पदोन्नतीच्या पदास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याची राज्य वेतन सुधारणा समिती २००८ ची शिफारस (अहवाल परि.३.७.२) शासनाने स्विकारली आहे. त्यानुसार पोलीस हवालदार हा संवर्ग पोलीस नाईक या संवर्गाचे पदोन्नतीचे पद असेल तर त्यास रुपये १००/- अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करता येऊ शकेल.त्याकरिता पोलीस संवर्गातील पदोन्नती साखळी तसेच पोलीस नाईक व पोलीस | शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत मा. अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | हवालदार या दोन्ही संवर्गाचे सेवाप्रवेश नियम या विभागास उपलब्ध करुन द्यावेत" त्यानुसार शासनाने उपस्थित केलेल्या मुद्यावरील अभिप्राय व संबंधीत्यांचे सेवाप्रवेश नियम शासनास या कार्यालयाचे पत्र क्रमांक पोमसं/३०/वेतनश्रेणी प्र.अ./१०७/२०१३, दिनांक १९.११.२०१५ च्या पत्रान्वये पुरविण्यात आले आहेत. यावरील शासनाचे अंतिम आदेश प्रलंबित आहेत. ते प्राप्त होताच त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. | |
| २. | **<u>मुद्दा क्रमांक २</u> :- श्री.राजेश प्रधान, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण**<br><br>**(<u>कार्यासन क्र. ३०</u>)** | पोलीस दलातील पोलीस शिपाई, पोलीस नाईक, पोलीस हवालदार, सहायक पोलीस उप निरीक्षक अशी चार पदे असून त्यांचे वेतन श्रेणी ५२००-२०२०० अशी असून पोलीस नाईकापासून पुढे पदोन्नती मिळणाऱ्या प्रत्येक पदामध्ये ग्रेड पे २०००, २४००, २८००, ४२०० या प्रमाणे देण्यात यावा. | प्रस्तुत प्रकरणी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव वेतन त्रुटी समितीसमोर ठेवण्याविषयी पाठपुरावा करावा.<br>तसेच, सदर प्रस्ताव मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणण्यात येईल. | **वरील प्रमाणे** | **वरील प्रमाणे** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ३. | **मुद्दा क्रमांक ४ :- पो.ह.क्र.५८२७, मनोज बाबुराव सावंत, मध्यवर्ती पोलीस ठाणे, ठाणे शहर**<br><br>**(कार्यासन क्र.६)** | शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना अत्युत्कृष्ट कामाबद्दल आगाऊ वेतनवाढ मंजूर करण्याबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. आवेवा-१०९० / प्र.क्र.१५२ / आठ, दिनांक २९/१०/१९९० अन्वये मंजूरी देण्यात आलेली होती. परंतु, सदर योजनेला सहावा वेतन आयोग मंजूर झाल्यानंतर स्थगिती देण्यात आलेली आहे. तरी सदरची योजना पुन्हा कार्यान्वीत करण्याची तरतूद होणेस विनंती आहे. | यासंदर्भात शासनाने अद्याप धोरण निश्चित केलेले नसल्याने त्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करावा. | शासन निर्णय गृह विभाग पत्र क्रमांक रापोसे - २२०९ / प्र.क्र.४१० / पोल-१अ, दि. १७.३.२०१२ अन्वये अत्युत्कृष्ट कामगिरी-बद्दल आगावू वेतनवाढी देण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडून शासनाचे धोरण निश्चित होताच तसे आदेश शासनाकडून निर्गमित होतील, असे कळविले आहे. त्याअनुषंगाने शासनाकडून अद्यापही कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत. | **चर्चेनंतर सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| ४. | **मुद्दा क्रमांक ५ :- पो.ह.क्र.५८२७, मनोज बाबुराव सावंत, मध्यवर्ती पोलीस ठाणे, ठाणे शहर**<br><br>**(कार्यासन क्र.९)** | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र. (NGO) / ७१३९ / ४८ / २०१४, दिनांक १६.०९.२०१४ अन्वये विविध पदक धारक / सन्मानचिन्ह धारक पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना पोलीस महासंचालकांचे ओळखपत्र देण्याची योजना दिनांक २६.०१.२०१४ व त्यानंतर पदक प्राप्त होणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तरी दिनांक ३०.०१.२०१५ पुर्वी जे पोलीस अधिकारी / कर्मचारी विविध पदक धारक / सन्मानचिन्ह धारक आहेत व ते सध्या सेवेत कार्यरत आहेत. परंतु, प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आलेले नाहीत. अशा पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडील प्रशस्तीपत्र मिळणेस विनंती आहे. | पोलीस महासंचालकांच्या ओळखपत्राचा काय फायदा होणार आहे किंवा त्यांना कोणत्या सवलती मिळणार आहेत अशी संबधीत कार्यासनास विचारणा करुन, याबाबत पूर्ण विचारांती प्रस्ताव तयार करावा असे अध्यक्षांनी निर्देश दिले आहेत. | पोलीस महासंचालकांच्या ओळखपत्राचा फायदा किंवा सवलती सध्यातरी काही नाही. पोलीस महासंचालकांचे ओळखपत्र देण्याची योजना पोलीस महासंचालक यांच्या आदेशान्वये कार्यरत करण्यात आली आहे. | **चर्चेनंतर सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ५. | **मुद्दा क्रमांक १० :- पो.शि.क्र.४०७, अमोल विजयकुमार देशमुख, जालना**<br><br>**(कार्यासन क्र. २०-अ व २३)** | महाराष्ट्र पोलीस दलातील विशेषत: ग्रामीण भागातील जिल्ह्यातील पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना गुन्ह्याचे तपास व त्याबरोबर कायदा व सुव्यवस्थेचा बंदोबस्त करावे लागतात. त्याचा परिणाम असा होतो की, गुन्ह्याच्या तपासात सातत्य राहत नाही. त्यामुळे गुन्ह्यातील शिक्षेच्या प्रमाणात वाढ होत नाही. गुन्ह्याचा तपास, व कायदा व सुव्यवस्थेचे सततचे बंदोबस्त करावे लागत असल्यामुळे पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचेवर मानसिक व शारिरीक ताण तणाव वाढून गंभीर स्वरुपाचे आजार वाढत आहेत. तसेच सतत गुन्ह्याचे तपास व कायदा व सुव्यवस्थेच्या बंदोबस्तामुळे कुटुंबियांकडे विशेषत: मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष पुरविणे शक्य होत नाही.<br>याकरिता ग्रामिण भागातील जिल्हा पातळीवर गुन्ह्याचे तपासकामी व कायदा व सुव्यवस्थेच्या बंदोबस्ताकरीता वेगवेगळे दोन विभाग निर्माण करण्यात यावे, जेणेकरुन सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी हे कुटुंबियांकडे लक्ष देवू शकतील. त्यामुळे पोलीसांवर येणारा कामांचा ताण कमी होवून होणारे आजार टळू शकतील. | गुन्हांचा तपास आणि कायदा व सुव्यवस्था, असे दोन वेगवेगळे विभाग निमार्ण करुन अंमलदारास भरती झाल्यानंतर सुरुवाती-पासूनच त्यांना एकाच प्रकारचे म्हणजे बंदोबस्ताचे किंवा गुन्हयाच्या तपासाचे काम करावे लागेल. त्यामुळे सदरचा मुद्दा तपासण्यात यावा असे अध्यक्षांनी निर्देश दिले आहेत. | गुन्ह्याचा तपास आणि कायदा व सुव्यवस्था असे दोन वेगवेगळे विभाग निर्माण करण्याच्या अनुषंगाने या कार्यालयाचे कार्यासन क्रमांक ४४ कडील क्रमांक DGP / 44 / seperation of investigation Unit/05/2015, दि.२४.५.१५ अन्वये स्थायी आदेश २४/२०१५ निर्गमित करण्यात आले आहेत. | प्रस्तुत प्रकरणी सर्व घटक प्रमुखांकडून आढावा घेवून, पूर्तता अहवाल मा.पोलीस महासंचालकांचे निदर्शनास आणून देण्याबाबत मा.अध्यक्षांनी निर्देश देऊन,<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ६. | **<u>मुद्दा क्रमांक १२</u> :- पो.शि.क्र.४०७, अमोल विजयकुमार देशमुख, जालना**<br><br>**(<u>कार्यासन क्र.१</u>)** | पोलीस दलातील पोलीस अधिकारी / कर्मचारी पोलीस पदातील कर्तव्य पूर्ण करुन सेवानिवृत्त होतात त्यांना सेवानिवृत्त ओळखपत्र देण्याची व्यवस्था नाही. सेवानिवृत्त ओळख पत्र देण्याची भविष्यात व्यवस्था करावी ही अपेक्षा आहे. | पोलीस दलातील पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर ओळखपत्र देण्याविषयीच्या सूचना / आदेश सर्व घटकांना देण्यात आलेले आहेत. जालना जिल्हा पोलीस दलात असे ओळखपत्र दिले जात नसल्यास पोलीस अधीक्षक, जालना यांना तसे कळविण्यात यावेत. | पोलीस खात्यातील प्रदीर्घ सेवा पूर्ण करुन शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस उप अधीक्षक ते पोलीस शिपायापर्यंतच्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर ओळखपत्रे व सेवानिवृत्ती प्रमाणपत्र ते ज्या घटकातून सेवानिवृत्त होणार आहेत त्या घटक प्रमुखांनी देण्याबाबत सर्व घटक प्रमुखांना या कार्यालयाचे दिनांक २६.१०.२०१० च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे. सदर परिपत्रकाची प्रत पोलीस अधीक्षक जालना यांना या कार्यालयाचे दिनांक १९.१२.२०१५ च्या पत्रान्वये पाठविण्यात आले असून, पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतरचे ओळखपत्र व सेवानिवृत्त प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यवाही त्यांच्या स्तरावर करण्याबाबत कळविले आहे. | प्रस्तुत प्रकरणी पोलीस अधीक्षक, जालना यांचेकडून पूर्तता अहवाल मागवावा. तसेच, सर्व घटक प्रमुखांना याबाबत कळवून, त्याबाबतचा पूर्तता अहवाल मागविण्याविषयी सूचित करुन, **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ७. | **<u>मुद्दा क्रमांक १३ :-</u>** **पो.शि.क्र.४०७, अमोल विजयकुमार देशमुख, जालना** (<u>कार्यासन क्र.९</u>) | पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना अत्युत्कृष्ट कामगिरी/सेवेसाठी गौरव करुन संबंधितांना राष्ट्रपती पदक, पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येते. पण संबंधीतास आगाऊ वेतनवाढ देण्याची व्यवस्था सहावे वेतन आयोगामध्ये बंद केलेली आहे. पदक प्राप्त पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देण्याची व्यवस्था होणे अपेक्षित आहे.<br>तसेच, पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना अत्युत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येते, अशा पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना एस्.टी. प्रवास सवलत देण्याची व्यवस्था अपेक्षित आहे. | प्रस्तुत प्रकरणी मा. मुख्यमंत्री महोदयांना अर्ध शासकीय पत्राद्वारे विनंती करण्यात येईल. | पदक धारक / सन्मानचिन्ह धारक पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना विविध सवलती मंजूर करण्याबाबत २००६ पासून शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तथापि, मा.मुख्यमंत्री महोदयांना अर्ध शासकीय पत्राद्वारे विनंती केलेली नाही. | **चर्चेनंतर सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| ८. | **<u>मुद्दा क्रमांक १४ :-</u>** **पो.शि.क्र.४०७, अमोल विजयकुमार देशमुख, जालना** (<u>कार्यासन क्र. २४</u>) | पोलीस स्टेशनला जप्त केलेल्या दोन चाकी, चार चाकी वाहनांच्या संख्येमध्ये दिवसें-दिवस मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. पोलीस स्टेशनला दोन चाकी, चार चाकी वाहन ठेवण्यासाठी जागा कमी पडत आहे. जप्त केलेली वाहने खराब होत आहेत. संबंधीत वाहनांची संख्या अभिलेखावरुन कमी करण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरीय एक समिती गठीत करणे अपेक्षित आहे. सदर समितीने लिलाव पध्दतीने अथवा अन्य पध्दतीने वाहनांची संख्या अभिलेखावरुन कमी करण्यास सुलभ होईल. | जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव करण्याविषयी नियमावलीत तरतूद आहे. त्या प्रक्रियेचा अवलंब करावा, असे मा. अध्यक्षांनी निर्देश दिले. | मा.सर्वोच्च न्यायालय यांनी त्यांचेकडे दाखल झालेल्या रिट पिटीशन क्रमांक १४/२००८, जनरल इन्श्युरन्स कौन्सिल व इतर वि. आंध्र प्रदेश सरकार व इतर यामध्ये दिनांक १९.०४.२०१० मध्ये दिलेल्या न्यायनिर्णयान्वये सीआरपी कलम ४५१ व ४५७ नुसार पोलीस स्टेशनला बेवारस स्थितीत असलेली वाहने नष्ट करण्याबाबत संबंधित परिक्षेत्रातील पोलीस महानिरीक्षक, आयुक्तालयाच्या स्तरावर पोलीस आयुक्त व जिल्हा स्तरावर पोलीस अधीक्षक यांनी योग्य ती कार्यवाही करुन, त्याबाबतचा अहवाल पाठविण्याबाबत या कार्यालयाचे क्रमांक पोमसं/२४/३४/पो.क.वृंद परिषद/२७९/२०१४, दिनांक ०२.०१.२०१६ च्या पत्रान्वये सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात आले आहे. | मा. अध्यक्षांनी प्रस्तुत प्रकरणी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडून पूर्तता अहवाल मागविण्यात यावा, असे सूचित करुन, **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ९. | **मुद्दा क्रमांक -१६ :- पोलीस निरीक्षक मारुती ज्ञानदेव मगदूम बृहन्मुंबई**<br><br>**(कार्यासन क्र. २७ब)**<br><br>**पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई**<br>**कक्ष क्र. २(८)** | मुंबईतील दाटीवाटीचा परिसर विचारात घेता, निवासव्यवस्थेचे विकेंद्रीकरण, तसेच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांची सेवानिवृत्तीच्या वेळी आरोग्याच्या दृष्टिने निमार्ण झालेली विकलांगता, असहाय्यता, नातेवाईकांचे दुरावलेले संबध इत्यादि बाबींच्या पार्श्वभूमीवर सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदारांना निवृत्तीनंतर लगतच्या कालावधीत विनाविलंब सहजसुलभ निवासव्यवस्था त्यांच्या मुळ जिल्ह्यांच्या ठिकाणी उपलब्ध व्हावी यादृष्टिने प्रत्येक विभागीय विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक यांच्या पुढाकाराने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी पोलीस वसाहती, पोलीस गृहनिर्माण संस्था उभारण्याच्या दृष्टिने महसूल व वन विभाग, नगर विकास, ग्राम विकास, अपारंपारिक उर्जा विभाग, शासकीय गृह बांधणी प्राधिकरणे इत्यांदिशी सुसंवाद प्रस्थापित करुन अद्यावत वसाहती उभारण्याच्या दृष्टिने विशेष मोहिमा आयोजित होणे नितांत जरुरीचे आहे.<br>अनेक सेवाभावी पोलीस अधिकाऱ्यांच्या उत्स्फुर्त सामुहिक सहभागातुन मुंबई पोलीस दलातील पोलीस कर्मचाऱ्यांकरीता " बृहन्मुंबई पोलीस सहाकारी गृहनिमार्ण प्रकल्प, पनवेल " या महत्त्वाकांक्षी मेगाहाऊसिंग प्रोजेक्टची उभारणी चालू आहे. सदर प्रकल्पास सर्व संबधीतांचे उत्तम पाठबळ लाभल्यास तो अल्पावधीत पुर्णत्वास येईल. सदरचा प्रकल्प मुंबई, महाराष्ट्र तसेच देशभरातील पोलीसांसाठी प्रेरणादायी ठरेल. | सेवानिवृत्त पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानांची व्यवस्था होण्याच्या दृष्टीने आदेश झालेले असून, प्रत्येक विभागप्रमुखांकडून असा प्रकल्प राबविण्याबाबतचे काम हाती घेण्यात येत आहेत. पोलीस अधिकाऱ्यांच्या सामुहिक सहभागातून को-ऑप. संस्था निर्माण करुन वसाहती उभ्या करण्यासाठी जमीन उपलब्ध करुन घेण्याबाबत पुढाकार घ्यावा, असेही सांगण्यात आले आहे. यासाठी सार्वजनिक स्तरावर प्रयत्न केले गेले पाहिजेत. कोल्हापूर येथे अशी संस्था निर्माण केलेली आहे.<br>प्रस्तुत प्रकरणी मा. मुख्यमंत्री महोदयांना अर्ध शासकीय पत्राद्वारे विनंती करण्यात येईल. | सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी कोणताही प्रकल्प, पोलीस कर्मचाऱ्यांसाठी को.ऑप. संस्था निर्माण करण्याचे काम, तसेच, पनवेल येथील प्रकल्पाचे कामकाज या कार्यालयाकडे सुरु नाही.<br>यास्तव, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानाची व्यवस्था होण्याच्या दृष्टीने या कार्यालयाकडून कोणताही प्रस्ताव गेलेला नाही. | पोलीस कर्मचाऱ्यांसाठी को. ऑप. संस्था निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात खाजगी जागा मालकी तत्वावर प्राप्त करुन घेण्याबाबतची कार्यवाही करून, को. ऑप. संस्था निर्माण करण्याबाबत सर्व घटक प्रमुखांना सूचित करण्यात यावे. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १०. | **मुद्दा क्रमांक -१७ :- पोलीस निरीक्षक मारुती ज्ञानदेव मगदूम बृहन्मुंबई**<br><br>(**कार्यासन क्र. २६ब, २८-अ**) | पोलीस हॉस्पिटल्स्मध्ये आरोग्याचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने सद्य:स्थितीत असलेल्या हॉस्पिटल्स, प्रयोगशाळामधील सुविधा, तसेच तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपलब्धता, तसेच इमारत इत्यादी संबधाने आढावा घेऊन मध्यवर्ती ठिकाणी / महत्वाच्या ठिकाणी असलेले हॉस्पिटलांचे नुतनीकरण तसेच तेथे संपूर्ण दिवसभर तज्ञ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध राहतील, तसेच दर्जेदार औषधांचा सदैव पुरवठा राहील व गरजू पोलीस अधिकारी व अंमलदारांना तत्परतेने सदर सेवेचा सदैव उत्तम प्रकारे लाभ मिळत राहील यादृष्टिने काळजीपुर्वक पाठपुरवठा व्हावा. प्रत्येक जिल्ह्यांच्या ठिकाणी सुसज्ज पोलीस हॉस्पिटल्स्ची निर्मिती होणे जरुरीचे आहे. | पोलीस रुग्णालयांची सोय किती जिल्ह्यांमध्ये अद्याप नाही. तसेच पुणे, नागपूर, ठाणे यांच्याकडे किती पोलीस रुग्णालये उपलब्ध आहेत याबाबतचा आढावा घ्यावा. तसेच, ज्या ठिकाणी अशा सोयी नाहीत, त्याठिकाणी त्यांची आवश्यकता आहे काय, हे तपासून पाहून तशा प्रस्तावावर विचार करण्यात येईल असे अध्यक्षांनी सांगितले. | पोलीस रुग्णालयांची सोय पालघर, कोल्हापूर, अकोला, वाशिम आणि जालना हे पाच जिल्हे वगळता सर्व जिल्ह्यांमध्ये उपलब्ध आहे. पुणे, ठाणे, नागपूर या शहरांमध्ये प्रत्येकी एक पोलीस रुग्णालय उपलब्ध आहे.<br>कोल्हापूर, वाशिम, अकोला आणि जालना या जिल्ह्यांमध्ये पोलीस रुग्णालयांची निर्मिती करण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाले असून, त्यावर कार्यासन क्रमांक २६-ब कडून कार्यवाही करण्यात येत आहे. पालघर जिल्ह्यात रुग्णालयाची आवश्यकता आहे किंवा कसे, याबाबत त्यांचेकडे विचारणा करण्यात आली आहे. अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल. | विविध घटकांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करावेत. तसेच मानधन तत्वावरील डॉक्टर, नर्सेस व वॉर्डबॉय यांची नेमणूक करण्याविषयी सर्व घटक प्रमुखांकडे खात्री करावी, असे अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ११. | **मुद्दा क्रमांक -१९ :-**<br><br>**मपोशि.क्र.३३२/ मंगला आसूटकर चंद्रपुर**<br><br>(**का. क्र.२७-ब**) | महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांकरिता एक स्वतंत्र "हिरकणी" कक्ष असावा. ज्या कक्षाच्या आतमध्येच प्रसाधान गृहाची सुविधा असावी. जेणेकरुन त्या कक्षामध्ये लहान मुलं असलेले महिला पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना त्यांच्या बाळाला स्तनपान करतांना कोणतीही समस्या उद्‌भवणार नाही. तसेच महिला पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना काही वैद्यकीय अडचण निमार्ण झाल्यास सदर कक्षाचा लाभ घेता येईल. | सदरचा मुद्दा योग्य असून अशा कक्षाची उभारणी झाली पाहिजे. जेणेकरुन महिलांना कोणतीही समस्या निर्माण होणार नाही. याबाबत प्रस्ताव घटक कार्यालयांनी तयार करुन या कार्यालयास पाठवावा. | **कार्यासन क्रमांक २७-ब**<br>राज्यात २८४ पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता प्रसाधनगृह व विश्रामगृह उपलब्ध आहेत. तसेच, ६७९ ठिकाणी महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता प्रसाधनगृह व विश्रामगृह बांधकाम करण्याबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे.<br>**कार्यासन क्रमांक २८-अ**<br>पोलीस विभागातील पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या ६ महिने ते १० वर्षे वयोगटातील मुलांच्या संगोपनासाठी पोलीस मुख्यालयाच्या ठिकाणी सकाळी ०८.०० ते रात्रौ ०८.०० या कालावधीसाठी पाळणाघर सुरु केल्यास महिला व पुरुष पोलीस कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ होईल. विशेषत: महिला पोलीस कर्मचाऱ्यांना त्यांचे कर्तव्य बजावतांना पाल्यांच्या संगोपनाची कोणतीही गंभीर अडचण निर्माण होणार नाहीत. तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या प्रसंगी त्या कर्तव्यावर तात्काळ उपलब्ध होऊ शकतील या दृष्टीने ज्या घटकांच्य आस्थापनेवर पाळणाघर सुरु करण्याची आवश्यकता आहे. अशा घटक प्रमुखांनी पोलीस कल्याण निधी नियमावलीतील तरतुदींनुसार त्यांना प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय प्राधिकारानुसार त्यांच्या घटकांत पाळणाघरे सुरु करण्याची कार्यवाही करावी. पाळणाघरे सुरु करण्यासाठी अपेक्षित खर्च त्यांच्या वित्तीय मर्यादेतीलच असावा. जर काही घटकांत तो खर्च मर्यादेपेक्षा जास्त असेल तरच तसा प्रस्ताव मंजूरीसाठी या कार्यालयास सादर करावा. अशा सूचना या कार्यालयाचे क्रमांक पोमसं/२८-अे/४९३७/परिपत्रक-पाळणाघर/३१/२०१४,<br>दिनांक १८.१०.२०१४ च्या परिपत्रकान्वये सर्व घटक प्रमुखांना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार पोलीस अधीक्षक, रायगड/अमरावती ग्रामीण/ठाणे ग्रामीण/ठाणे शहर/बीड/नाशिक ग्रामिण/नांदेड/ रत्नागिरी / जालना / नागपूर शहर / लातूर / धुळे / परभणी / अमरावती शहर / अकोला / औरंगाबाद ग्रामीण /उस्मानाबाद/सांगली (एकुण १८) या ठिकाणी पाळणाघरे सुरु करण्यात आलेली आहेत व पोलीस अधीक्षक, हिंगोली व पुणे ग्रामीण (एकुण ०२) याठिकाणी पाळणाघरे सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. समादेशक रा.रा.पो.बल, गट क्र. १४ (भाराब), औरंगाबाद, १ व २, पुणे, ६, धुळे, ७, दौंड, ११, नवी मुंबई, पोलीस अधीक्षक, भंडारा, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा/जालना/नागपूर/धुळे/अकोला (एकुण ११) यांनी पाळणाघराची आवश्यकता नसल्याचे कळविले आहे.<br>ज्या घटकांकडून माहिती प्राप्त झाली नाही त्या घटक प्रमुखांना दिनांक १०.११.२०१५ रोजी स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. | मुख्यालय व पोलीस स्टेशन ह्या ठिकाणी योग्य ती जागा पाहून महिला पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी प्रसाधनगृह, विश्रामगृह व मुलांच्या संगोपनासाठी पाळणाघर सुरु करण्याबाबतच्या व्यवस्थेविषयीचा पूर्तता अहवाल सर्व घटक प्रमुखांनी ३ महिन्यांत पाठविण्याबाबत सूचित करण्यात आले. |

**४६व्या राज्यस्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेसाठी सभासद नसलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर मा. अध्यक्षांनी आढावा घेवून दिलेल्या सूचना.**

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे / घटकाचे नाव | सभासद नसलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १. | **मुद्दा क्रमांक ४ :- डॉ.आरती सिंह, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण**<br><br>(का क्र. ३५) | पोलीस कोठडीत कैद्यासाठी सद्या प्रतिदिन रु. ४०/- असे दर शासनाने ठरवुन दिलेले आहेत. सदर दराप्रमाणे आहार पुरविणे शक्य नसल्याबाबत काही कंत्राटदार यांनी सांगितले आहे. त्यामुळे सदर दरात वाढ होणे आवश्यक आहे. | पोलीस कोठडीतील कैद्यांना देण्यात येणाऱ्या आहाराचे दर वाढविण्याबाबत चा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला असल्याने, त्याबाबत कार्यासनाने शासनाकडे पाठपुरावा करावा. | शासन निर्णय क्रमांक एमआयएस-०५०९ / प्र.क्र. १०५ / पोल-८, दिनांक २६.०२.२०१० अन्वये दिनांक ०१.०४.२०१० पासून<br>१) बृहन्मुंबई रेल्वे क्षेत्र व इतर महानगरपालिका क्षेत्र येथील पोलीस कोठडीतील कैद्यांसाठी - प्रतिदिन प्रतिडोई रु. ५०/- असा लागू आहे.<br>२) उर्वरित महाराष्ट्रातील पोलीस कोठडीतील कैद्यांसाठी - प्रतिदिन प्रतिडोई रु.४०/- असा लागू आहे.<br>वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर पोलीस कोठडीतील कैद्यांना आहार पुरविण्यासाठी आहारभत्याचे दर वाढविण्याबाबत सर्व घटक कार्यालयाकडून माहिती मागविण्यात आली होती. सदरहू प्राप्त माहिती व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे प्रस्तावाचे आधारे<br>१) बृहन्मुंबई रेल्वे क्षेत्र व इतर महानगरपालिका क्षेत्र येथील पोलीस कोठडीतील कैद्यांसाठी - प्रतिदिन प्रतिडोई रु. १५०/-<br>२) उर्वरित महाराष्ट्रातील पोलीस कोठडीतील कैद्यांसाठी प्रतिदिन प्रतिडोई रु.१००/-<br>अशी दरवाढ होण्याबाबतचा प्रस्ताव, या कार्यालयाचे पत्र क्रमांक पोमस/३५/२८०१/अेसीएम/०५/२०१४, दि११.११.२०१४ अन्वये शासनास सादर करण्यात आला आहे. तसेच, मा.अध्यक्षांनी दिलेल्या आदेशानुसार दिनांक २६.०२.२०१५, दिनांक ०६.०४.२०१५, दिनांक २९.०६.२०१५, दिनांक ०५.०८.२०१५, दिनांक ०५.०९.२०१५ व दिनांक २१.१०.२०१५ च्या पत्रान्वये शासनास स्मरणपत्र सादर करण्यात आली आहेत. अद्याप शासन आदेश प्रलंबित आहेत. | प्रस्तुत प्रकरणी संबधित कार्यासनाने शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत अध्यक्षांनी सूचित केले आहे. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे / घटकाचे नाव | सभासद नसलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| २. | **मुद्दा क्रमांक ५ :- डॉ.आारती सिंह, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण**<br><br>(**कार्यासन क्र.३०**) | सध्या अर्धवेळ अंशकालीन सफाई कामगार यांना दरमहा रुपये १,२००/- देण्यात येत आहे. महागाई पाहता, हे वेतन पुरेसे ठरत नाही. तरी वेतनात वाढ करणे आवश्यक आहे. | यासंदर्भात शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला असल्याने, त्याबाबत कार्यासनाने शासनाकडे पाठपुरावा करावा. | विविध पोलीस घटक कार्यालयाठिकाणी नेमणूकीस असलेल्या सर्व अंशकालीन सफाई कामगारांना समान वेतन मिळावे, त्यांचे कामाचे स्वरुप / कार्य प्रमाण / कामाच्या वेळा इत्यादी बाबी निश्चित करुन त्यामध्ये एकसुत्रीपणा यावा, त्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन मिळावे म्हणून प्रस्तुत प्रकरणी शाासनास या कार्यालयाचे क्र.पोमसं/३०/अं.स.का./पो.अ.ठाणे ग्रा./२२५-२०११, दिनांक ०४.११.२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. | प्रस्तुत प्रकरणी वेतनवाढ देण्याबाबत संबंधीत कार्यासनाने शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत मा.अध्यक्षांनी सूचित केले आहे. |

**४६व्या राज्यस्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेसाठी सभासद असलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेल्या मुद्यांवर मा. अध्यक्षांनी आढावा घेवून दिलेल्या सूचना.**

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १ | **मुद्दा क्रमांक १ :- पोलीस निरीक्षक, मारुती ज्ञानदेव मगदुम, भायखळा पोलीस ठाणे, बृहन्मुंबई. (का. क्र.२८व ३१)** | पोलीस कर्मचारी सतत उभे राहून काम करीत असल्याने त्यांच्या पायांच्या शिरा काळ्या पडण्याच्या आजाराचा (Vericose Vens) सदर योजनेमध्ये समावेश करण्याबाबत, तसेच पोलीस रुग्णालयामध्ये पोलीस सर्जनची कमतरता असते, त्यावर विचार करण्यात यावा. | पोलीस रुग्णालयात पार्ट टाईम बेसिसवर किंवा हॉनररी पध्दतीने पोलीस सर्जनची नेमणूक करण्यासाठी सदर पद निर्माण करण्याकरिता प्रथम शासनास प्रस्ताव पाठविण्यात यावा. तसेच पायांच्या शिरा काळ्या पडण्याच्या (Vericose Vens) ह्या आजाराचा महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेमध्ये समावेश करण्याबाबत विचार करण्यात येईल असे निर्देश मा.अध्यक्षांनी दिले. | याबाबत महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेचे त्रयस्थ पक्ष प्रशासक यांचे अभिप्राया मागविण्यात आले असून त्यांनी सादर केलेले अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.<br>As per MPKAY rules presently "Varicose Veins" is not included under MPKAY.<br>As Vericose Vains is chronic disease and in primary level it is treated at OPD basis by use of anticoagulants, stockings and exercise.<br>And in advance states if the above mentioned treatment doesn’t respond then operative procedures endovenous laser treatment, radiofrequency ablation and foam sclerotherapy, surgery for varices of the greater saphenous vein can be planned.<br>As the treatment in initial stages is done on OPD basis and later on planned surgery is advised in chronic cases, in both the scenarios, as OPD treatment & planned surgeries are not covered under MPKAY, the treatment for varicose vein is not covered under MPKAY. | महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेअंतर्गत शासनाने निश्चित केलेल्या २७ आकस्मिक व ०५ गंभीर आजारांवर विनाखर्च औषधोपचाराची सुविधा उपलब्ध असल्याने आणि Vericose Vens हा आजार आकस्मिक नसल्याने, सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| २. | **मुद्दा क्रमांक २ :- पोलीस निरीक्षक, मारुती ज्ञानदेव मगदुम, भायखळा पोलीस ठाणे, बृहन्मुंबई.**<br><br>**(का. क्र.२८)**<br>**का.क्र.३१** | महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेमध्ये गुडग्यावरील शस्त्रक्रियेचा समावेश होण्याबाबत, तसेच वैद्यकिय बिलांमध्ये वारंवार त्रुटी काढून बिले परत केली जातात. त्यामुळे रक्कम मिळण्यास विलंब होतो. यावर उपाय योजून वैद्यकिय बिले तातडीने मंजूर होतील अशी उपाय योजना करण्याबाबत. | महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेमध्ये ज्या आजारांचा समावेश करण्यात आलेला आहे, त्या तातडीच्या आजारांमध्ये "गुडग्यावरील शस्त्रक्रिया" हा आजार मोडत नाही. महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना ही विनाखर्च स्वरुपाची आहे. परंतु, कर्मचाऱ्याने वैद्यकिय कारणास्तव स्वत: खर्च केलेल्या खर्चाची प्रतिपुर्ती मिळण्यासाठी वैद्यकिय देयक सादर केल्यानंतर त्यात त्रुटी राहू नयेत, म्हणून कार्यालयामध्ये एका कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यात येवून त्याने सदरची देयके तपासून त्रुटीरहित परिपूर्ण वैद्यकिय देयक कोषागारात सादर करुन, संबंधितांना वैद्यकिय प्रतिपुर्तीची रक्कम लवकरात लवकर अदा करण्याबाबतची कार्यवाही करावी. | **<u>का.क्र. २८</u>**<br>गुडघ्यावरील शस्त्रक्रिया ही आकस्मिक उद्धाणाऱ्या आजारात मोडत नाही. तसेच, शासन नियमानुसार महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेच्या आजारांच्या २७+५=३२ मध्ये गुडघ्यावरील शस्त्रक्रिया या आजाराचा समावेश नाही. त्यामुळे महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेत गुडघ्यावरील शस्त्रक्रिया या आजाराचा समावेश नाही.<br>अशा सम प्रकरणात शासनास या कार्यालयाचे<br>१) पत्र क्रमांक पोमसं/२८/४९३७/मपोकुआयो/२३१/ १४, दि.०५.११.२०१४ अन्वये<br>२) पत्र क्र.१६/पो.आ./कक्ष-१३/कुंआयो/१४, दि. ०५.११.२०१४ अन्वये<br>1] Hysterectomy Surgery<br>2] High Grade Fever (Dengue, Leptospirosis, Chikunguniya, Malaria<br>3] PID related surgeries<br>4] Liver Diseases<br>5] Implant / Removal / Secondary / surgeries<br>शासनास सदरचे आजार ३२ आजारात समाविष्ट करण्यासाठी प्रस्ताव सादर केला असता, अद्यापही शासनाने मान्यता दिली नाही. याबद्दल चर्चेनंतर निर्णय घेण्यात येईल.<br>**<u>का.क्र. ३१</u>**<br>वैद्यकिय देयके कोषागारात सादर करतांना काही मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याबाबत, तसेच प्रत्येक कार्यालयामधील लेखा अधिकारी व समकक्ष दर्जाचे अधिकारी यांनी कर्मचाऱ्यांची देयके व्यवस्थितरित्या तपासून त्रुटीविरहीत देयके कोषागारात सादर करण्याची दक्षता घेण्याबाबत सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात आले आहे. | विविध पोलीस घटकांतील पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांची वैद्यकिय प्रतिपुर्तीची देयके सिव्हील सर्जनकडे न पाठविता पोलीस सर्जन कडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविण्याबाबत मा.अध्यक्षांनी निर्देश दिले. तसेच, वैद्यकिय देयक लवकरात लवकर पारीत होऊन देयकाची रक्कम संबंधीतांना वेळीच प्राप्त व्हावी, याकरिता, सर्व घटकातील संबंधीत लिपिक व कार्यालय अधीक्षकांची कार्यशाळा आयोजित करुन, त्यांना वैद्यकिय देयक तयार करतांना मार्गदर्शनपर आवश्यक त्या सूचना/निर्देश देण्याबाबत सुचविले व याबाबतचा पूर्तता अहवाल १५ फेब्रुवारी पर्यंत मा.पोलीस महासंचालकांच्या अवलोकनार्थ सादर करण्याबाबत आदेश दिले. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| **३.** | **मुद्दा क्रमांक ३ :- पोलीस निरीक्षक, मारुती ज्ञानदेव मगदुम, भायखळा पोलीस ठाणे, बृहन्मुंबई.**<br><br>**(का. क्र.२८)** | पती-पत्नी वैद्यकिय कारणास्तव रुग्णालयात दाखल असल्यास महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेअंतर्गत आवश्यक असणारी कागदपत्रे (उदा. कुटुंब मर्यादेचे प्रमाणपत्र, महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेचे ओळखपत्र इ.) जमा करण्यासाठी एक को-ऑर्डिनेटर अधिकारी किंवा अंमलदार नेमणे आवश्यक आहे. ओळखपत्र दाखवून सुध्दा अडचण निर्माण झालेली आहे. | सदर योजनेतंर्गत उपचारादरम्यान अशी अडचण निर्माण होता कामा नये. अशा बाबींसाठी एक को-ऑर्डिनेटर अधिकारी नेमण्यात आला पाहिजे. जेणेकरुन त्याच्यामार्फत या सर्व बाबी पूर्ण करुन घेता येवू शकतील. या मुद्यावर विचार करण्यात येईल. सदर योजनेचे सभासद असलेले ओळखपत्र दाखवूनसुध्दा, जर अशी परिस्थिती उद्भवत असेल तर आपण त्या हॉस्पिटलला कारणे दाखवा नोटीस पाठवू शकतो. एखाद्या पोलीस कर्मचाऱ्याची सेवा समाप्त झालेली असेल तर त्याला सदर योजनेची सुविधा मिळू शकणार नाही. सेवा समाप्त झाली असेल तर त्याचे कार्ड काढून घेता येईल. यावर तोडगा काढण्यासाठी एखादी वेगळी पध्दत अवलंबीता येईल काय, याचा विचार करण्यात येईल. | रुग्णालयात कोणताही रुग्ण किंवा पती -पत्नी दाखल झाल्यास रुग्णालयाकडून मागविण्यात येणारी आवश्यक प्रमाणपत्रे घटक प्रमुख पुरवितात. घटक प्रमुखांकडून सदरची प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेण्यासाठी मे.मेडी असिस्ट (त्रयस्थ पक्ष प्रशासक) यांचा प्रतिनिधी तसेच घटक कार्यालयातील MPKAY चे कामकाज पाहणाऱ्या स्वतंत्र कक्षातील कर्मचारी या प्रमाणपत्रांच्या पुर्ततेसाठी काम करीत आहेत. MPKAY योजना सुरळीतपणे राबविण्यासाठी प्रत्येक घटक प्रमुखांना स्वतंत्र कक्ष स्थापन करणे. त्यातील कर्मचाऱ्यांनी कार्यक्षमतेने कामकाज पार पाडणे, यासारख्या काटेकोरपणे सूचना देण्यात आल्यानुसार सर्व पोलीस घटक कार्यालयांनी MPKAY करिता स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याबाबत या कार्यालयाचे क्रमांक पोमसं/२८/मपोकुआयो-प्रलंबित देयके / १८९ / २०१५ अन्वये सूचना देण्यात आल्यानुसार सर्व संबंधित घटक कार्यालयांनी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. सदर कक्षामध्ये नेमण्यात आलेले कर्मचारी हे MPKAY ची योजना यशस्वीपणे पार पाडत असल्याने सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा. | महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेअंतर्गत विनाखर्च औषधोपचाराचा लाभ पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना घेताना, रुग्णालयात आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता करणेकामी स्वतंत्र कक्ष स्थापन करुन, त्याप्रमाणे सर्व घटक प्रमुखांना परिपत्रक निर्गमित करुन, सदरचे परिपत्रक सर्व पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणण्याकरिता घटक प्रमुखांनी त्यांचे घटकांतील प्रत्येक पोलीस स्टेशन व विविध शाखांमध्ये नोटीस बोर्ड वर ठेवण्याची व्यवस्था करावी.<br>त्याचप्रमाणे महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेबाबत राज्य पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना अवगत होण्यासाठी Maharashtra Police Website वर काही माहिती टाकण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे घटकांच्या वेबसाईट वर सुध्दा आवश्यक ती सर्व माहिती वेळोवेळी प्रसारित करावी.<br><br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात येत आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ४. | **मुद्दा क्रमांक ४ :- मपोशि/३ ३ २, मंगला बालाजी आसूटकर, चंद्रपूर**<br><br>**(का. क्र. ६)** | पोलीस कर्मचाऱ्यांच्या शिक्षणाला प्राधान्य देण्यात यावे. सध्या पोलीस कर्मचारी पोस्ट ग्रॅज्युएट असतो त्यांना शासनाच्या बी.ए. पोलीस प्रशासन उपक्रमांतर्गत शिक्षणाची संधी उपलब्ध आहे. पोलीस कर्मचारी उच्चशिक्षीत असेल तर त्याच्या काम करण्याच्या पध्दतीमुळे त्याला अनेक रिवॉर्ड मिळतील. त्याला प्रोत्साहन देण्यासाठी त्याची नेमणूक पोलीस विभागातील महत्वाच्या शाखेमध्ये करुन त्यांना त्याच्या चांगल्या कामाबद्दल एक आगावू वेतनवाढ देण्यात यावी. आपल्याकडे महिला कर्मचारीसुध्दा पोस्ट ग्रॅज्युएट आहेत. त्यांच्या नेमणूका महत्वाच्या शाखांमध्ये करुन त्यांच्या शिक्षणाचा उपयोग करुन घेता येईल. | **सदर मुद्याबाबत विचार करण्यात येईल.** | शासन निर्णय गृह विभाग पत्र क्रमांक रापोसे - २२०९ / प्र.क्र.४१० / पोल-१अ, दिनांक १७.३.२०१२ अन्वये अत्युत्कृष्ट कामगिरीबद्दल आगावू वेतनवाढी देण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडून शासनाचे धोरण निश्चित होताच तसे आदेश शासनाकडून निर्गमित होतील, असे कळविले आहे. त्याअनुषंगाने शासनाकडून अद्यापही कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत.<br>पोलीस शिपायांची भरती त्या पदाच्या सेवाप्रवेशान्वये शासनाद्वारे विहित केलेल्या अर्हतेनुसार होते व त्यांच्या नियुक्त्या शासनाद्वारे निर्गमित केलेल्या बदली अधिनियमातील तरतूदींनुसार केल्या जातात.<br>उच्च शिक्षणानुसार त्यांच्या कोणत्याही नियुक्त्या करण्याबाबत कोणतेही शासन आदेश नाहीत. | **चर्चेनंतर सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ५. | **मुद्दा क्रमांक ५ :- मपोशि/३ ३ २, मंगला बालाजी आसूटकर, चंद्रपूर**<br>**कार्यासन क्रमांक ५** | पोलीस उपनिरीक्षकांच्या परिक्षेबाबत:<br>यामध्ये गुणवत्तेनुसार व ज्येष्ठतेनुसार अशा दोन प्रवाहांचा अंतर्भाव होतो. शासनाच्या प्रचलित निर्णयानुसार / पध्दतीनुसार ज्येष्ठतेनुसार पद भरती घेण्यात येते. परंतु गुणवत्तेनुसार ज्यावेळी ज्येष्ठता असेल त्यावेळी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना सुध्दा संधी दिली गेली पाहिजे व निवृत्तीपूर्व पोलीस उप निरीक्षकपदी सेवा मिळाली पाहिजे असा विचार करण्यात यावा. | या संदर्भात सध्या प्रत्येक उमेदवार मॅटमध्ये जात आहे. परिक्षेचे नियम वेगवेगळे असतात. ते नियम तपासून पुढील निर्णय घेणे उचित होईल. जे उमेदवार परीक्षा उत्तीर्ण होतात. त्यांना नियमाप्रमाणे व ज्येष्ठतेनुसार पात्र ठरवावे लागेल. | पोलीस उपनिरीक्षक (सेवा प्रवेश) नियम१९९५ मधील नियम उपनियम (अ) नुसार किमान ५ वर्षे सेवा झालेल्या पोलीस हवालदार / सहायक पोलीस उपनिरीक्षक यांचाी विभागीय अर्हता परीक्षा घेवून सदर परीखेत पात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना ज्येष्ठता - नि-पात्रतेच्या अधीन राहून पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती देण्यांत येत होती. (संवर्गाच्या २५%)<br>आता, शासन आदेश दिनांक २९.०६.२०१३ अन्वये पोलीस उपनिरीक्षक (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०१३ तयार करण्यात आला असून त्यांच्यात पुढील प्रमाणे नमूद करण्यात आले आहे.<br>पोलीस उपनिरीक्षक (सेवाप्रवेश नियम, १९९५ मधील नियम-३ मधील उपनियम (अ) खालीलप्रमाणे सुधारित करण्यात यावा:-<br>"(अ) पोलीस बलातील पोलीस शिपाई किंवा पोलीस नाईक किंवा पोलीस हवालदार किंवा सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत असलेल्या ज्या उमेदवारांची पोलीस बलात रुजु झाल्यापासून १० वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सलगसेवा झालेली आहे आणि जे उमेदवार शासनाने, वेळोवेळी विशेष अथवा सर्वसाधारण आदेशाद्वारे, विहित केलेल्या परीक्षा नियमानुसार पोलीस महासंचालकांनी घेतलेल्या विभागीय परीक्षेत अर्हताप्राप्त करतात, अशा उमेदवारांमधुन ज्येष्ठता-नि-पात्रतेच्या अधीन योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीद्वारे, "<br>पोलीस उपनिरीक्षक (निश:स्त्र) (संवर्गाच्या २५%) ही पदे उपरोक्त नमूद सुधारीत सेवा प्रवेश नियमानुसार उत्तीर्ण उमेदवारांमधून सेवाज्येष्ठतेने पदोन्नतीने भरण्यात येतात. त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता नाही. | **प्रस्तुत प्रकरणी उच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत सर्व घटक प्रमुखांना पाठवावी.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ६. | **मुद्दा क्रमांक ६ :- पोलीस निरीक्षक, एस्.आय्.अली, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १४, औरंगाबाद.**<br><br>**(का.क्र. २८-अे)** | पोलीस अधीक्षक पातळीवर पोलीस कर्मचाऱ्यांच्या मुलांकरिता ५ टक्के आरक्षण ठेवण्यात यावे. | पोलीस कर्मचाऱ्यांच्या मुलांकरिता ५ टक्के आरक्षण ठेवणे शक्य होणार नाही. पोलीस कर्मचाऱ्यांच्या मुलांना शाळेत प्रवेश मिळण्यासाठी जिल्हा स्तरावर घटकप्रमुख आपआपल्या स्तरावर / पातळीवर प्रयत्न करीत असतात. समादेशकांनी सुध्दा राज्य राखीव पोलीस बलातील कर्मचाऱ्यांच्या मुलांना शाळेत प्रवेश मिळण्यासाठी त्यांच्या स्तरावर प्रयत्न करावेत. | या कार्यालयाचे क्रमांक पोमसं / १६ / ३६९९ / कवृंप ४६वी सभा / ०५ / २०१४, दिनांक २३.०३.२०१५ अन्वये सर्व घटक प्रमुखांना सदर बैठकीच्या इतिवृत्तांताची प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे. | प्रस्तुत प्रकरणी सभासदांचे नक्की काय म्हणणे आहे हे जाणून घेतल्यानंतर आदेश निर्गमित करण्यात येतील. |

# ४७व्या राज्यस्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेसाठी सभासद असलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव</th><th>सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे</th><th>संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय</th><th>अध्यक्षांचे आदेश</th></tr>
<tr><td></td>
<td>मनोज बाबुराव सावंत,<br>पोहवा/५८२७, मध्यवर्ती पोलीस ठाणे, ठाणे शहर.<br>का. क्र. ३०.<br><br>(मुद्दा क्रमांक १५ मध्ये सदर मुद्दा उपस्थित आहे)<br><br>बाळकृष्ण धनवान खांडेकर,<br>सपोह/५९०, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ९, अमरावती<br>कार्यासन क्रमांक ३०</td>
<td>मुद्दा क्रमांक १ :-<br>पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे वाहन भत्त्यात वाढ होणे बाबत.<br><br>मुद्दा क्रमांक २<br>वाढत्या महागाईचे दृष्टीकोनातून पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या प्रवास भत्त्यामध्ये वाढ होणेस विनंती आहे.</td>
<td>राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाचे स्वरुप लक्षात घेता वाहन भत्ता (Conveyance Allowance) मंजूर करण्यात आलेला आहे. सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दिनांक ०३.०३.२०१० च्या शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या वाहन भत्त्याच्या दरात वित्त विभाग, शासन निर्णय, क्र. प्रवास १०१३/प्र.क्र.१३/ सेवा-५, दिनांक २३.०९.२०१३ नुसार सुधारणा करण्यात आली आहे. (पोलीस विभागामध्ये पोलीस वाहने उपलब्ध असल्याने, पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना सदरचा भत्ता देय नाही.)<br>सदरच्या मुद्दा कर्मचाऱ्यांना वेतनात मिळणाऱ्या वाहतूक भत्त्याच्या अनुषंगाने असल्यास, कर्मचाऱ्यांच्या ग्रेड वेतनानुसार दिनांक ०१.०४.२०१० पासून वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वाहभ-२०१४/प्र.क्र.५/सेवा-५, दिनांक ०३.०६.२०१४ अन्वये खालील नमूद केल्याप्रमाणे वाहतूक भत्ता देय आहे.
<table>
<tr><th rowspan="2">अ. क्र.</th><th rowspan="2">कर्मचाऱ्यास अनुज्ञेय ग्रेड वेतन</th><th colspan="2">दरमहा वाहतूक भत्त्याचा दर (रु)</th></tr>
<tr><th>अ-१ व अ वर्ग शहरे</th><th>इतर ठिकाणे</th></tr>
<tr><td>१.</td><td>रु.५,४००/- किंवा त्याहून अधिक</td><td>२,४००/-</td><td>१,२००/-</td></tr>
<tr><td>२.</td><td>रु. ४,४००/- किंवा त्याहून अधिक परंतू, रु.५,४००/- पेक्षा कमी</td><td>१,२००/-</td><td>६००/-</td></tr>
<tr><td>३.</td><td>रु. ४,४००/- पेक्षा कमी</td><td>४००/-</td><td>४००/-</td></tr>
</table>
वर नमूद वाहतुक भत्त्याच्या दरात वाढ करण्यास शासन सक्षम प्राधिकारी असल्याने, बैठकीमध्ये सध्याच्या दरात कितपत वाढ करावी वा मुद्यांवर चर्चा / विचारविनियम झाल्यास शासनास तसा प्रस्ताव सादर करावा अगर कसे, त्याबाबत निर्णय घेण्यात यावा.</td>
<td>प्रस्तुत प्रकरणी पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतनात त्यांनां ग्रेड पे नुसार वाहतूक भत्ता देण्यात येत असल्याचे तपासावे. जर वाहतूक भत्ता देण्यात येत नसल्यास, त्यानुसार शासनास प्रस्ताव सादर करावा.</td></tr>
</table>

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|
| | मनोज बाबुराव सावंत, पोहवा/५८२७, मध्यवर्ती पोलीस ठाणे, ठाणे शहर.<br>**<u>का. क्र. १ ते ६</u>** | **<u>मुद्दा क्रमांक ३ :-</u>**<br>पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या नैमित्तीक / किरकोळ रजा पुर्वीप्रमाणे २१ दिवस होणेबाबत. | **<u>का.क्र. १</u>** ५व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार पोलीस विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना (भारतीय पोलीस सेवा अधिकारी वगळून) या कार्यालयाच्या कार्यासन क्रमांक ३ च्या दिनांक २६.०४.१९९९ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक एल्व्हीई ०२९९/प्र.क्र.१५१/पोल ५-ब, दिनांक २३.०३.२००० अन्वये एका कॅलेंडर वर्षात १६ दिवसांऐवजी १२ दिवस नैमित्तिक रजा अनुज्ञेय करण्यात आल्या आहेत.<br>तरी, श्री.सावंत यांनी पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना नैमित्तिक रजा वाढवून देण्याबाबत उपस्थित केलेल्या मुद्याबाबत कार्यासन क्रमांक ३ कडून अभिप्राय घेणे उचित होईल.<br>**<u>का.क्र.५</u>** पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचारी (भारतीय पोलीस सेवा अधिकारी वगळून) यांना सध्या देय असलेल्या १६ दिवसांऐवजी एका कॅलेंडर वर्षामध्ये जास्तीत जास्त १२ दिवस नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहील, असे शासन निर्णय क्रमांक एल्व्हीई ०२९९/प्र.क्र.१५१/पोल ५-ब, दिनांक २३.०३.२००० मध्ये नमूद आहे.<br>पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या नैमित्तीक / किरकोळ रजा पुर्वी २१ असल्याबाबत अभिलेख उपलब्ध नाही. परंतु पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सदरच्या नैमित्तीक रजा वाढवून २१ करण्याबाबत मान्य असल्यास शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल.<br>**<u>का.क्र. ३</u>** पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचारी (भारतीय पोलीस सेवा अधिकारी वगळून) यांना सध्या देय असलेल्या १६ दिवसांऐवजी एका कॅलेंडर वर्षामध्ये जास्तीत जास्त १२ दिवस नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहील, असे शासन निर्णय क्रमांक एल्व्हीई ०२९९/प्र.क्र.१५१/पोल ५-ब, दिनांक २३.०३.२००० मध्ये विहित करण्यात आले आहे.<br>पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नैमित्तीक / किरकोळ रजा पुर्वी २१ दिवस असल्याबाबत अभिलेख उपलब्ध नाही. शासनाने नैमित्तीक रजा १६ वरुन १२ इतक्या कमी केल्या असल्यामुळे त्या पुन: वाढवून १६ अथवा २१ दिवस करण्याबाबत शासनास प्रस्तावित करावे, किंवा कसे, याविषयी निर्णय घेणे आवश्यक आहे.<br><br>**<u>का.क्र.६</u> :-** यावर निर्णय घेण्यास शासन सक्षम प्राधिकारी आहे. | **चर्चेनंतर सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|
| | मनोज बाबुराव सावंत, पोहवा/५८२७, मध्यवर्ती पोलीस ठाणे, ठाणे शहर. <u>**का. क्र. ६ व ३०.**</u> | <u>**मुद्दा क्रमांक ४ :-**</u> हक्क व सरेंडर रजेचे, पुर्वी रजा न उपभोगता रोखीकरण होत होते. परंतु, सध्या सदरची पध्दत बंद करण्यात आली आहे, ती पुन्हा चालू होण्याबाबत. | <u>**का.क्र.३०**</u> पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरुप इतर शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांच्य पेक्षा वेगळे आहे. सणाच्या दिवशी इतर कर्मचाऱ्यांना सार्वजनिक सुट्टी असते, त्यावेळी पोलीस कर्मचाऱ्यांना अशा सुट्ट्या घेता येत नाहीत. कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नामुळे त्यांना मंजूर केलेली रजा देखील काही वेळा उपभोगता येत नाहीत. रजा अर्ध्यावर सोडून त्यांना कर्तव्यावर हजर व्हावे लागते. कामाची जबाबदारी व कामाचे स्वरुप विचारात घेवून पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना एका वित्तीय वर्षात १५ दिवसांची रजेच्या प्रत्यार्पणास गृह विभाग, शासन निर्णय क्र.एलव्हीई-२००२/प्र.क्र.५६४/पोल-५, दिनांक २७.०२.२००४ अन्वये मंजूरी दिली आहे. सदरची पध्दत अद्याप अस्तित्वात आहे.<br><br><u>**का.क्र.६**</u> **:-** यावर निर्णय घेण्यास शासन सक्षम आहे. | राज्य पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना १ जानेवारी ते ३१ डिसेंबर पर्यंत १५ दिवस रजा उपभोगता यावी, याकरिता सर्व घटक प्रमुखांनी पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या रजांविषयी आराखडा (Calendar) तयार करावा व पूर्तता करावी.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| | बाळकृष्ण धनवान खांडेकर, सपोह/५९०, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ९, अमरावती <u>**अपोमसं, रारापोबल, म.रा., मुंबई**</u> | <u>**मुद्दा क्रमांक ५ :-**</u> राज्य राखीव पोलीस दलातील कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांचा विचार करता नियमित गडचिरोली बंदोबस्त ६ महिने ऐवजी ३ महिने करण्यात यावा. | याबाबत पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांनी राज्य राखीव पोलीस बल कंपन्यांचा नक्षल बंदोबस्त कालावधी ०३ महिने करु नये असे अभिप्राय दिलेले आहेत. सदरची बाब सैनिक संमेलनात वारंवार उपस्थित केली जाते. तरी सदर कालावधी हा १२० दिवस (४ महिने) करणे उचित होईल असे वाटते. या १२० दिवसांच्या कालावधीत अर्जित रजा मिळणार नाही. (अत्यंत तातडीचे प्रसंगी किरकोळ रजा व वैद्यकिय रजा अपवाद असेल). | राज्य राखीव पोलीस बलातील कंपन्यांचा नक्षल बंदोबस्ताचा कार्यकाल ०५ महिने करण्यात आला आहे. तरी सदर कार्यकाल ०५ ऐवजी ०४ महिने करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव</th><th>सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे</th><th>संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय</th><th>अध्यक्षांचे आदेश</th></tr>
<tr><td></td><td>बाळकृष्ण धनवान खांडेकर, सपोह/५९०, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ९, अमरावती<br><u>अपोमसं, रारापोबल, म.रा., मुंबई</u></td><td><u>मुद्दा क्रमांक ६ :-</u> राज्य राखीव पोलीस दलाच्य कंपन्या मालेगांव जिल्हा नाशिक येथे कर्तव्यार्थ असतांना त्यांना राहण्याकरिता व मेस करिता सोयीसुविधा पुरविण्यात यावी.</td><td>प्रस्तुत प्रकरणी समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ६, धुळे यांनी मालेगांव येथील कंपनीस दिलेल्या भेटीच्या अहवालानुसार राहण्याकरिता मेसकरीता तसेच इतर सोयीसुविधा पुरविण्याबाबत या कार्यालयाकडून दिनांक ०४.०८.२०१५ च्या अर्ध शासकीय पत्रान्वये पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामिण यांना कळविण्यात आले आहे.</td><td>राज्य राखीव पोलीस बलाच्या मालेगांव नाशिक येथे कायम तैनात असलेल्या कंपन्यांकरिता १०० जण एकत्र राहू शकतील अशाप्रकारे बॅरेक्स उपलब्ध करुन देण्याबाबत, अपर पोलीस महासंचालक (नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना निर्देश देवून, तसेच मुंबई, ठाणे, भिवंडी व नाशिक ग्रामीण अशा ठिकाणी बंदोबस्तासाठी राज्य राखीव पोलीस बलाच्या कायम तैनात करण्यात आलेल्या कंपन्यांच्या सोयीसुविधांसाठी जागा उपलब्ध असल्यास अहवाल सादर करण्याबाबत पोलीस आयुक्त, मुंबई व ठाणे आणि पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण / नाशिक ग्रामीण यांना कळविण्याबाबत अध्यक्षांनी निर्देश दिले आहेत.</td></tr>
<tr><td></td><td>आर.बी.पुरकर, पोलीस उपनिरीक्षक, बिनतारी संदेश (अभि.), म.राज्य, पुणे<br><br><u>का. क्र. ३०.</u></td><td><u>मुद्दा क्रमांक ७ :-</u> पोलीस बिनतारी विभागातील पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) हे पद कार्यकारी पोलीस दलामधील पोलीस शिपाई पदाचे समकक्ष आहे, परंतु, त्यांचे वेतन श्रेणी मध्ये खालील प्रमाणे फरक आहे.
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>पदनाम</th><th>वेतनश्रेणी</th><th>ग्रेड वेतन</th></tr>
<tr><td>१.</td><td>पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस)</td><td>५२००-२०२००</td><td>१८००</td></tr>
<tr><td>२.</td><td>पोलीस शिपाई (कार्यकारी दल)</td><td>५२००-२०२००</td><td>२०००</td></tr>
</table>
त्याअनुषंगाने पोलीस बिनतारी विभागातील पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) या पदास कार्यकारी पोलीस दलामधील पोलीस शिपाई पदाची वेतनश्रेणी देणेसंदर्भात कार्यवाही होणेस विनंती आहे.</td><td>कार्यकारी पोलीस शिपाई व कर्मशाळा मदतनीस (पोलीस शिपाई) या दोन्ही संवर्गाचे सेवाप्रवेश नियम भिन्न भिन्न आहेत. तसेच, त्यांचे कामाचे स्वरुप देखील वेगवेगळे आहेत. पोलीस शिपाई यांचेकरिता १२वी परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तर, कर्मशाळा मदतनीस (पोलीस शिपाई) या पदासाठी १०वी परिक्षा उत्तीर्णाची अट आहे.<br>पोलीस शिपायांना सेवेत दाखल झाल्यानंतर ९ महिन्याच्या खडतर प्रशिक्षणास सामोरे जावे लागते. तर, कर्मशाळा मदतनीस यासाठी कोणतेही प्रशिक्षण नाही. पोलीस शिपायांना प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर गुन्हे तपास</td><td>पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांना पोलीस शिपाई (कार्यकारी दल) प्रमाणे वेतनश्रेणी दिल्यास शासनास किती आर्थिक भार सोसावा लागेल, ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांना पोलीस शिपाई (कार्यकारी दल) प्रमाणे वेतनश्रेणी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविण्याबाबत अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत.</td></tr>
</table>

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|
| | | | / गुन्हेगारांना शोधणे, निवडणूका / मोर्चे, नैसर्गिक अघात, मानवीनिर्मिती तंटे, दहशतवादी हल्ले अशी विविध कामे हाताळावी लागतात. तसेच कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी सदैव कर्तव्यावर हजर रहावे लागते. तर, कर्मशाळा मदतनीस यांचे कामाचे स्वरुप बिनतारी कर्मशाळे पुरते मर्यादित असते. त्यांना जरी पोलीस शिपाई या पदाशी समकक्ष धरण्यात येत असले, तरी कामाची तुलना करता पोलीस शिपाई पदावरील कर्मचाऱ्यास जास्त जबाबदारीचे काम आहे. तरी वरील बाब लक्षात घेवून बैठकीमध्ये चर्चेअंती निर्णय घेण्यात यावा. | |
| | आर.बी.पुरकर, पोलीस उपनिरीक्षक, बिनतारी संदेश (अभि.), म.राज्य, पुणे<br><br>**<u>का. क्र. ३०.</u>** | **<u>मुद्दा क्रमांक ८ :-</u>** नियमित पदोन्नतीपासून वंचित राहणाऱ्या कर्मचाऱ्या यांना कुंठितता घालविणेसाठी आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पुढील पदोन्नतीची वेतनश्रेणी देण्यात येते.<br>पोलीस बिनतारी संदेश विभागांतर्गत पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांना एकाच पदावर सलग १२ वर्षे सेवा झालेनंतर पुढील १२ वर्षे पुढील वेतन श्रेणीमधील पहिला लाभ देण्यात येतो. (पोलीस शिपाई ५२००-२०२००, ग्रेड वेतन-२४००) पहिल्या लाभानंतर एकाच पदावर सलग पुढील १२ वर्षे सेवा झालेनंतर देण्यात येणाऱ्या आश्वासित प्रगती योजनांतर्गत २४ वर्षानंतर दुसऱ्या या लाभाच्या वेतनश्रेणीमध्ये त्यांना कोणत्याही प्रकारचा फायदा मिळत नाही.<br><br>त्याअनुषंगाने पोलीस बिनतारी विभागामधील पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांना आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दुसऱ्या लाभाचे वेतनश्रेणीमध्ये सुधारणा होऊन त्यांना योग्य ते लाभ मिळणेसंदर्भात कार्यवाही होणेस विनंती आहे. | पदोन्नतीच्या संधी नसलेल्या एकाकी पदांच्या कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अंतर्गत पहिल्या लाभानंतर १२ वर्षांनी नियमित सेवा पुर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना सदर योजना दुसरा लाभ कशा पध्दतीने देण्यात यावा, याबाबत वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वेतन-११०९/ प्र.क्र.४१/सेवा-३, दिनांक ०५.०७.२०१० अन्वये स्पष्टरित्या निर्देश दिलेले असल्याने, सदर मुद्यांत नमूद कर्मचाऱ्यांना देखील त्यानुसार आश्वासित प्रगतीचा दुसरा लाभ देय राहील. | प्रस्तुत प्रकरणी सुधारीत प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|
| | किरण शामराव पोवार, पोलीस हवालदार क्रमांक ९००/ इचलकरंजी पोलीस ठाणे, कोल्हापुर<br><br>**का. क्र. ९ व २८.** | **मुद्दा क्रमांक ९ :-** पोलीस दलामध्ये गुणवत्तार्पूर्वक सेवा केल्याबद्दल तसेच शौर्यपूर्वक कामगिरी केल्याबद्दल राष्ट्रपतीचे सेवा पदक देऊन गौरविण्यात येते. सदरचे पदक प्राप्त करण्यासाठी पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना सातत्यपूर्ण उत्कृष्ठ कामगिरी करित स्वतःचा सेवापट सर्वोकृष्ठ ठेवणेसाठी वर्षोनूवर्षे अहोरात्र परिश्रम घ्यावे लागतात मात्र पदक प्राप्त झालेनंतर संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांना सन्मानाखेरीज व प्रशस्तीपत्राखेरीज कोणत्याही प्रकारचा विशेष लाभ दिला जात नाही. मा. गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे कार्यालयाकडील क्र. ११०२६ / १ / २०१३ - PMA Government of India Ministry of Home Affairs POLICE DIVISION (PMA CELL) New Delhi, Dated २३.०६.२०१४ अन्वये तसेच मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र. पोमसं / विशा (१०) / ५२५६ / सं. ओ. पत्र / ४१ / २०१४, दिनां क १४.०७.२०१५ अन्वये शौर्यपदक तसेच सेवापदक धारकांना संगणकीय ओळखपत्र देण्याची केंद्र शासनाची योजना या अन्वये सध्या राष्ट्रपती पोलीस पदक मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांना वयाची ६० वर्षे पूर्ण झालेनंतर ५० टक्के रेल्वे प्रवासामाध्ये सवलत केंद्र शासनाने जाहीर केलेली आहे.<br>वरील सवलत ही अधिकारी / कर्मचाऱ्यांना जेष्ठ नागरिक म्हणून देखील वयाची ६० वर्षे पूर्ण झालेनंतर मिळू शकते. परंतु, सतत मानसिक तणावाखाली काम करणारे पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती नंतरचे सरासरी आयुर्मानाचा विचार करता, सदर पदक जाहीर झाले नंतरच्या दिनांकापासून पदकप्राप्त अधिकारी / कर्मचाऱ्यांना खास बाब म्हणून किमान दोन आगाऊ वेतनवाढीसह पदक जाहीर झाले पासून केंद्र सरकारकडून रेल्वे प्रवास सेवा मोफत मिळावी, तसेच, विमान सेवेमध्ये विशेष सवलत मिळावी. त्याचप्रमाणे पोलीस महासंचालकांचे पदकप्राप्त झालेल्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना किमान एक आगाऊ वेतनवाढ देण्यात यावी, जेणेकरुन भविष्यामध्ये इतर पोलीस अधिकारी / कर्मचारी हे पदकप्राप्त पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवेचा आदर्श समोर ठेवून पोलीस दलामध्ये उत्कृष्ट व गुणवत्तापूर्ण सेवा बजाविण्यासाठी प्रोत्साहित राहतील. | शौर्यापदक धारक पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना विमान प्रवासात सवलत मिळण्यासाठी व सेवापदक धारकांना रेल्वे प्रवासात वयाच्या ६० वर्षानंतर ५०% सवलत मिळण्यासाठी केंद्र शासनाकडून ओळखपत्र देण्यात येते.<br>शौर्यपदक धारकांना आणखी सुविधा मिळतात. परंतु, सदरच्या सुविधा त्या-त्या विभागाने मंत्रलयांनी जाहीर केलेल्या आहेत, ज्याचा या विभागाशी काहीही संबंध येत नाही.<br>विविध पदकप्राप्त पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना सवलती मिळण्याबाबत या कार्यालयाकडून गृह मंत्रालयाशी पत्रव्यवहार सुरु असून, आगावू वेतनवाढ, एक टप्पा पदोन्नती, एस.टी.प्रवासात सवलत व खात्यांतर्गत पोलीस उपनिरीक्षक परीक्षेस बसण्यासाठीच्या अटी शिथील करण्याबाबत प्रस्ताव सादर केला होता.<br>याबाबत शासनाने आगावू वेतनवाढ व एक टप्पा पदोन्नती या दोन बाबी धोरणात बसत नाहीत म्हणून कळविले आहे. परंतु, एस.टी.प्रवासात सवलत बाबत व खात्यांतर्गत परीक्षेस बसण्याच्या अटी शिथील करण्याबाबत अनुकुलता दर्शविली आहे. याबाबत पत्रव्यवहार चालू असून, अंतिम निर्णय अद्याप बाकी आहे. | **चर्चेनंतर सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| | श्री. दिपक नर्थेसिंग गिरासे, पोलीस हवालदार क्रमांक ४०४/ रा. रा. पो. बल, गट क्र. ११ , नवी मुंबई<br>**का. क्र. ०९.** | **मुद्दा क्रमांक १०:-** पोलीस दलातील अधिकरी / कर्मचारी यांना "पोलीस पदक " व "मा. पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह" देऊन गौरव केला जातो. परंतू सन्मान धारक पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे आर्थिक व इतर फायदे मिळत नाहीत. पदक धारकांना व सन्मानचिंन्ह धारकांना प्रोत्साहनार्थ विशेष फायदे मिळावेत ही विनंती. | | |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|
| | श्री. मारुती ज्ञानदेव मगदूम, पोलीस निरीक्षक, परि.४, विशेष शाखा-१, गु.अ.वि, बृहन्मुंबई.<br><br>**<u>का. क्र. २७-अ व २७-ब.</u>** | **<u>मुद्दा क्रमांक ११ :-</u>** महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळ सन १९८८ साली आंबिवली, अंधेरी (पश्चिम) येथील विस्तीर्ण भूखंड महामंडळाचे नांवे हस्तांतरित करुन दिलेला होता. तथापि, महामंडळाची निष्क्रीयता, तसेच उदासिनतेमुळे सदरचा भूखंडही इतरांनी हडप करुन त्यावर इमारती उभारल्या आहेत. तसेच, अतिक्रमणही केलेले आहे.<br>पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरांची दुरावस्था, डागडुजी न केलेल्या मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारती, शासकीय कार्यालये, अनेक गैरसोयी तसेच, मुलभूत सुविधांचा अभाव अशी विदारक परिस्थीती असतांनाही त्याकडे दुर्लक्ष करुन महामंडळाने आपल्या कार्यालयाचा पंचतारांकित कायापालट करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च केलेला आहे. सदरची बाब अविवेकी, तसेच आक्षेपार्ह आहे.<br>महामंडळाच्या स्थापनेपासून (सन १९७४) ते आतापर्यंत (सन २०१५) म्हणजेच ४१ वर्षाच्या प्रदिर्घ कालावधीत महामंडळाने पोलीसांच्या निवासस्थानांची समस्या, तसेच सोयी-सुविधा उपलब्ध करणे, इमारतींची डागडुजी, रंगरंगोटी इत्यादी बाबी संबंधाने केलेली कार्यवाही विचारात घेतली असता निराशाजनक परिस्थिती आहे.<br>वर नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळाची पोलीस यंत्रणेच्या कल्याणा संबंधाने उदासिनता, तसेच, निष्क्रियता तसेच आक्षेपार्ह व अविवेकी कार्यपध्दतीमुळे महामंडळाची स्थापना होवून, प्रदिर्घ कालावधी लोटला जावूनही अत्यंत निराशाजनक परिस्थिती आहे. वरिल नमूद बाबींमुळे महामंडळाचे व दुरान्वयाने पोलीस यंत्रणेचे फार मोठे नुकसान झालेले आहे. तसेच, पोलीसांच्या निवासस्थानांच्या प्रश्नाने उग्र स्वरुप धारण केलेले आहे.<br>वरील नमूद बाबींची गांभीर्यपूर्वक दखल घेवून पोलीस दलातील सर्व स्तरावरील अधिकारी व अंमलदारांचे व्यापक हित विचारात घेवून सदर महामंडळाचे कामकाज सचोटीने होईल व त्यात सातत्य राहील, यादृष्टीने सदर महामंडळाकडून केलेल्या कामकाजाचा संबंधाने योग्य त्या स्तरावर दर महिन्याला आढावा घेवून, त्याअनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही / उपाययोजना होईल, यादृष्टीने शासनाकडे योग्य तो पाठपुरावा करणेविषयी विनंती आहे. | आंबिवली, अंधेरी (पश्चिम) येथील भूखंड महामंडळाच्या नावावर होण्यासाठी महामंडळाने शासनास वेळोवेळी विनंती केली आहे. परंतू, शासनाने व पर्यायाने जिल्हाधिकारी कार्यालयाने सदर भूखंड महामंडळाच्या नावे केला नाही.<br>पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या घरांची दुरुस्ती व डागडुजी सारखी कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखाली होत असल्याने महामंडळाने दुर्लक्ष केलेले नाही.<br>महामंडळातर्फे नवीन प्रकल्पांचे काम शासनाच्या मान्यतेने करण्यात येते व देखभाल दुरुस्तीकरीता सार्वजनिक बांधकाम विभागास हस्तांतरीत करण्यात येते.<br>महामंडळाकडे सद्य:स्थितीत व भविष्यातील काम करण्यासाठी अधिकारी व कम्रचाऱ्यांना आवश्यक असणाऱ्या तांत्रिक सुविधा देण्यात आल्या आहेत.<br>महामंडळ शासन निर्णयानुसार ५० निवासस्थाने किंवा त्यापेक्षा अधिक निवासस्थाने व ५०० चौ.मी. किंवा ५०० चौ.मी.पेक्षा अधिक बांधकाम क्षेत्रफळाच्या अनिवासी प्रकल्पांची कामे करत आहे. | पोलीसांच्या जागेवरील अतिक्रमणे दूर करुन घेण्याबाबत तातडीने कार्यवाही करुन, त्याबाबतचा पूर्तता अहवाल २ महिन्याच्या मुदतीत या कार्यालयास पाठविण्याबाबत सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात यावे. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|
| | | | महामंडळामध्ये सध्या ६३ अधिकारी व कर्मचारी वर्ग आहे. यामध्ये पोलीस विभागाचे नियुक्तीवर २ अधिकारी, तांत्रिक शाखेमध्ये प्रतिनियुक्तीवर २ अधिकारी, महामंडळाचे कायमस्वरुपी ३ अधिकारी, ९ करारतत्वावर आणि लेखा शाखेमध्ये प्रतिनियुक्तीवर ५ अधिकारी काम करीत असून इतर कर्मचारी (३२) हा टंकलेखन, शिपाई ड्राईव्हर इ. आहेत.<br>महामंडळ प्रतिवर्षी साधारणपणे रक्कम सरासरी रुपये ३०० कोटींची कामे करीत आहे. १९९३ पासून महामंडळाने २२ वर्षामध्ये ८६,४९१ उपलब्ध निवासस्थानांपैकी सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी १३२१० निवासस्थानांचे आणि महामंडळाने १९९३ पासून १२६७५ निवासस्थानांचे म्हणजे एकूण २५८८५ बांधकाम केलेले आहे.<br><br>हुडको या वित्तीय संस्थेद्वारे कर्ज उभारणी करुन पोलीस निवासस्थानांचे बांधकाम करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. मुंबईमधील खालील ४ प्रकल्पाकरीता कर्ज मंजुरीसाठी हुडको या वित्तीय संस्थेस कागदपत्रे सादर केली आहे.<br>१,३६० निवासस्थाने वाकोला, मुंबई<br>२,१५६ निवासस्थाने घाटकोपर रेल्वे, मुंबई<br>३,३०० निवासस्थाने मुलुंड, मुंबई<br>४,४४८ निवासस्थाने मरोळ, मुंबई<br>शासनाने ४ चटई निर्देशांक (४ F.S.I.) बाबत शासन निर्णय क्रमांक टिपीबी ४३१३/१४५ /प्र.क्र.११९[२]/२०१३/नवि-११, दि. ०२.०.२०१५ रोजी मुंबईसाठी पारित केलेला आहे. मुंबईमध्ये ४ चटई निर्देशाकाप्रमाणे वाकोला, घाटकोपर रेल्वे, मुलुंड, मरोळ येथे प्रकल्प नियोजन स्तरावर आहेत. | |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|
| ६. | श्री.एस्.आय्.अली, पोलीस निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ६, धुळे<br><br>**का. क्र. ३०.**<br><br>श्री.रविंद्र बळीराम दामोदर, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, अकोला.<br><br>**कार्यासन क्रमांक ३०** | **मुद्दा क्रमांक १२ :-** पोलीस अधिकाऱ्यांना ४ वर्षातून एकदा रुपये ५,०००/- गणवेष भत्ता मंजूर करण्यात येतो. परंतु, आजमितीस स्थानिक बाजारातील दर हे अतिशय मोठ्या प्रमाणात वाढविलेले आहेत. त्याअनुषंगाने सदरची रक्कम ही कमी पडत असल्याने त्यात वाढ होणे जरुरीचे आहे. रुपये ५,०००/- गणवेष भत्त्यामध्ये वाढ होवून ४ वर्षामध्ये एकदा रुपये १०,०००/- अथवा ४ वर्षाचा कालावधी कमी करुन त्याऐवजी २ वर्षाचा कार्यकाल ठेवल्यास अधिकाऱ्यांना दरवर्षाला नवीन गणवेष शिलाई करणे सोयीचे होईल.<br><br>**मुद्दा क्रमांक १३** सध्या स्थित नियमानुसार राज्यातील पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस निरीक्षक पदाच्या सर्व अधिकारी यांना गणवेश भत्ता म्हणून रुपये ५,०००/- चार वर्षाकरीता देण्यात येतो. सध्या परिस्थीती नुसार महागाई व दरवाढी नुसार रुपये ५,०००/- भत्ता अपुरा पडतो. नजीकच्या काळात पोलीस कर्मचाऱ्यांचे करीता गणवेश भत्याबाबत नव्याने आदेश करण्यात आले आहे, त्या अनुषंगाने विचार होण्यास विनंती. | गृह विभाग, शासन निर्णय क्र. युएनएफ १२०४/ २४९२/प्र.क्र.२२/पोल-४, दिनांक ३०.०६.२००६ नुसार पोलीस उप निरीक्षक व त्यावरील हुद्यांचे पोलीस अधिकाऱ्यांना गणवेष भत्ता म्हणून दर चार वर्षांनी रुपये ५,०००/- इतके अनुदान मंजूर करण्यात येत आहे.<br>सदरच्या गणवेष अनुदान भत्त्यांमध्ये वाढीव गणवेष साहित्याच्या किंमतीचा विचार करता त्यामध्ये दरवर्षी रु.३,०००/- इतके किंवा चार वर्षासाठी रु. १२,०००/- इतके अनुदान मंजूर करण्यात यावे, त्यादृष्टीने कार्यालयाकडून कार्यवाही होत असून, याबाबत पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडून देखील गणवेष भत्त्यात वाढ करण्याबाबत त्यांचा अहवाल या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ ३०/गणवेष भत्ता वाढ/१७८/२०१५, दिनांक ०३.१२.२०१५ अन्वये मागविण्यात आला आहे.<br>बैठकीमध्ये चर्चोअंती यामध्ये काही ठोस निर्णय झाल्यास त्यावर शासनाकडे त्याअनुषंगाने पत्रव्यवहार करण्यात येईल. | प्रस्तुत प्रकरणी ४ वर्षातून एकदा रुपये १०,०००/- अथवा ०२ वर्षातून एकदा रुपये ५,०००/- याप्रमाणे बदल केल्यास शासनास आर्थिक भार किती सोसावा लागेल याबाबत विचार करुन, शासनास प्रस्ताव सादर करण्याबाबत अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|
| | श्री.शिवदत्त गणपत मालंडकर, सहायक गुप्तवार्ता अधिकारी, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.<br><br>**का. क्र. ३०.** | **मुद्दा क्रमांक १४:-** २००६ च्या सहाव्या वेतन आयोगात पोलीस नाईक ते पोलीस हवालदार यांच्या पदोन्नतीच्यावेळी मूळ वेतनात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. याला कारण तत्कालीन वेतन निश्चिती करणाऱ्या समितीत या प्रवर्गातला जाणकार व्यक्ती नेमलेला नव्हता. तरी आगामी सातव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चिती करणाऱ्या समितीत जबाबदार व पोलीस हवालदार / पोलीस नाईक यांची नेमणूक करण्यात यावी जेणेकरुन त्यांच्यावर होणाऱ्या न्यायाबाबत ते तात्काळ वरिष्ठांच्या निदर्शनास सदर बाब आणतील. | सहाव्या वेतन आयोगामध्ये पुर्वी पासून अस्तित्वात असलेल्या विविध वेतनश्रेण्या एकत्रितपणे गोठवून तया एकाच वेतनश्रेणीत विलिन करुन त्यात विविध पदांनुसार मूळ वेतन + ग्रेड वेतन अशी पध्दती करण्यात आली आहे.<br>पोलीस नाईक ते पोलीस हवालदार यांची वेतनश्रेणी रु.५२००-२०२०० अशी एकच आहे. तसेच त्या दोन्ही पदांना रु.२४००/- इतके समान ग्रेड वेतन मंजूर केलेले आहे.<br>पोलीस हवालदार हे पद पोलीस नाईक या पदावरील पदोन्नतीचे पद असल्याने त्यावर पदोन्नत झालेल्या कर्मचाऱ्यांना एकाच ग्रेड वेतन असल्याने त्यांच्या वेतनात फरक पडत नाही. तथापि, पोलीस नाईक पदावरील कर्मचाऱ्यांना रु.२००/- विशेष वेतन मंजूर असून, पोलीस हवालदार या पदावरील कर्मचाऱ्यांना रु.५००/- इतके विशेष वेतन मंजूर आहे. ६व्या वेतन आयोगाप्रमाणे मिळत असलेल्या ग्रेड वेतन मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करुन मिळण्याबाबत शाासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून, तो अद्याप शासन स्तरावर प्रलंबित आहे.<br><br>पद / सध्याचा ग्रेड पे / प्रस्तावित ग्रेड पे / पद / सध्याचा ग्रेड पे / प्रस्तावित ग्रेड पे<br>ASI / २८००/- / ३०००/- / HC / २४००/- / २८००/-<br>PN / २४००/- / २६००/- / PC / २०००/- / २४००/-<br><br>तसेच, कोणत्याही आयोगाची स्थापना शासन निर्देशानुसार होत असते. त्यामध्ये स्थापित समितीवर कोणकोणत्या पदाधिकाऱ्याची निवड करणे हे देखील शासनाकडून निश्चित केले जाते. आगामी ७व्या वेतन आयोगाची स्थापना झाल्यास समितीपुढे सदर बाबींचा उहापोह करण्यात येईल. | **प्रस्तुत प्रकरणी संबंधीत कार्यासनाने सभासद श्री.मालंडकर यांना बोलावून प्रस्ताव तयार करतांना त्यांची मदत घ्यावी.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|
| | श्री.शिवदत्त गणपत मालंडकर, सहायक गुप्तवार्ता अधिकारी, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.<br><br>**का. क्र. ०६.** | **मुद्दा क्रमांक १५:-** पोलीस नाईक हे पद पोलीस शिपायास अंदाजे २०/२१ वर्षानंतर पदोन्नतीवर मिळते. त्यानंतर पोलीस शिपाई २५/२६ वर्ष होवूनही पोलीस हवालदाराची पदोन्नती मिळत नाही. त्यामुळे पोलीस नाईक हे पद रद्द करुन सरळ पोलीस हवालदार, त्यानंतर सहायक पोलीस उपनिरीक्षक व निवृत्तीच्यावेळी पोलीस शिपायांना पोलीस उपनिरीक्षक हे पद सेवाज्येष्ठतेने मिळाल्यास सर्वांना सोयीस्कर होईल. कर्नाटक, पंजाब व राजस्थान या राज्यांमधील मा.पोलीस महासंचालकांनी तेथील शासनास अशा प्रकारचा प्रस्ताव पाठवून तेथील पोलीस कर्मचाऱ्यांना उपरोक्त प्रकारची पदोन्नती देत असल्याचे समजून येत आहे. तरी वरिष्ठांमार्फत शासनास असा प्रस्ताव सूचित करण्यास विनंती आहे. त्यामुळे पोलीस खात्यात व्यावसायीकरित्या काम करण्याची मानसिकता वाढेल. त्याचे चांगले परिणामही वरिष्ठ व शासनाला पहायला मिळतील. | पोलीस नाईक हे पद शासनाद्वारे निर्माण करण्यात आले असुन, महाराष्ट्र शासन, गृह विभाग पत्र क्रमांक पीएए-०३९६/ सीआर-२९०/पोल-४ अ, दिनांक १८.०८.२००१ अन्वये पोलीस हवालदार व पोलीस नाईक (सेवा प्रवेश) नियम २०००, दिनांक ०९.०५.२००१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.<br>पोलीस नाईक व पोलीस हवालदार या दोन्ही पदांची वेतनश्रेणी व ग्रेड वेतन भिन्न नसून सारखीच आहेत.<br>पोलीस नाईक हे पद रद्द करावयाचे झाल्यास सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करणे आवश्यक आहे.<br>परंतू, पोलीस उपनिरीक्षक हे पद १. सरळसेवा, २. विभागीय सरळसेवा आणि ३. स्थानापन्न पध्दतीने भरण्याबाबत शासन आदेश आहेत. त्यामुळे पोलीस उपनिरीक्षक हे पद गट-ब अराजपत्रिक आहे.<br>त्यामुळे पोलीस उपनिरीक्षक हे पद सहायक पोलीस उपनिरीक्षक यांना सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीने भरणे योग्य होईल, असे वाटत नाही. | प्रस्तुत प्रकरणी ग्रेड वेतन वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासन विचाराधीन असून, पाठपुरावा करण्याबाबत अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत. |
| | बाळकृष्ण धनवान खांडेकर, सपोह/५९०, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ९, अमरावती<br><br>**कार्यासन क्रमांक २७-ब** | **मुद्दा क्रमांक १६** राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक ३, जालना येथील शासकीय इमारती, कार्यालये, शासकीय निवासस्थान व बॅचलर बॅरेक हे निजामकालीन असून, नवी इन्फ्रास्ट्रक्चरप्रमाणे बांधकाम व्हावे. | **अपोमसं, रारापोबल, म.राज्य, मुंबई यांचे कार्यालय**<br>या संदर्भात या कार्यालयाचे दिनांक २२.०९.२०१५ चे पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाचे दिनांक २०.१०.२०१५ च्या पत्रान्वये पोलीस गृहनिर्माण कार्यालयास सादर करण्यात आला आहे.<br>**कार्यासन क्रमांक २७-ब**<br>समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ३, जालना येथील प्रशासकीय इमारती व निवासी व कार्यालयीन संकुले बांधकामाबाबत प्रस्ताव व्यवस्थापकीय संचालक, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. मुंबई यांना या कार्यालयाचे क्रमांक पोमसं/२७-बी/ २८-बी-२/बांधकाम रारापोबल गट क्र. ३, जालना/२०/२०१४, दिनांक १२.०५.२०१४ चे पत्रान्वये अंदाजपत्रक व नकाशे तयार करण्याकरिता सादर करण्यात आलेला आहे. याबाबत, दिनांक ३१.०३.२०१५ व दिनांक २०.१०.२०१५ चे पत्रान्वये पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. सदरचा प्रस्ताव व्यवस्थापकीय संचालक यांचे स्तरावर विचाराधीन आहे. | प्रस्तुत प्रकरणी व्यवस्थापकीय संचालक, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मार्यादित, मुंबई यांचेकडे तातडीने पाठपुरावा करावा, असे अध्यक्षांनी निर्देश दिले आहेत. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|
| | बाळकृष्ण धनवान खांडेकर, सपोह/५९०, रा.रा.पो.बल, गट क्र. ९, अमरावती<br>**कार्यासन क्र. २८** | **मुद्दा क्रमांक १७** पोलीस दलातील वर्ग ४ चे कर्मचारी न्हावी, धोबी, भोजनसेवक व सफाईगार यांना महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेचा लाभ देण्यात यावा. | महाराष्ट्र राज्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवेत कार्यरत असतांना विशिष्ठ जोखमीची कामे करावी लागतात. त्यांच्या सेवेचे स्वरुप लक्षात घेता शासनाने सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना सुरु केली.<br>महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्युएफ- १२०४/१४३/प्र.क्र. २/पोल-७, दिनांक ०७.०२.२००५ च्या पत्रान्वये "राज्य पोलीस दलातील मंत्रालयीन कर्मचारी व वर्ग ४ मधील सफाईगार व शिपाई यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वैद्यकिय सुविधा उपलब्ध असल्यामुळे महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनाअंतर्गत उपलब्ध असलेल्या सोयीनुसार त्यांना लागू न करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे".<br>राज्य कर्मचारी वृंद परिषदेच्या ४३व्या सभेमध्ये क्रमांक ४ मध्ये "महाराष्ट्र राज्यातील पोलीस अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेचा लाभ मिळतो, परंतु, मंत्रालयीन कर्मचारी (अनुग्रामी) न्हावी, मोची, धोबी, सफाई कामगार, मेस कर्मचारी यांना महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेचा लाभ मिळत नाही. मंत्रालयीन कर्मचारी व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना लाभ मिळण्यास करण्यात आलेली विनंती"<br>असा मुद्दा उपस्थित करण्यात आला असता त्याबाबत "शासन पत्र गृहविभाग क्रमांक पीडब्ल्युएफ-१२०४/१४३/प्र.क्र. २/पोल-७, दिनांक ०७.०२.२००५ अन्वये राज्य पोलीस दलातील लिपीक वर्गीय कर्मचारी व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वैद्यकिय सुविधा उपलब्ध असल्यामुळे, त्यांना महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना लागू न करण्याचा निर्णय घेतला असल्याची बाब सर्व घटकांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे", असा निर्णय देण्यात आला असून त्याबाबत सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात आलेले आहे, व सदरचा मुद्दा निकाली निघाला आहे. | राज्य राखीव पोलीस बलातील वर्ग-४ चे कर्मचारी न्हावी, धोबी, भोजनसेवक व सफाईगार हे राज्य राखीव पोलीस बलातील कंपन्याबरोबर कायदा व सुव्यवस्थेच्या बंदोबस्ताकरिता शहरात तसेच ग्रामिण भागात, त्याचप्रमाणे नक्षलग्रस्त भागात कर्तव्यार्थ हजर राहत असल्याने, सदर कर्मचाऱ्यांना देखील महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेचा लाभ मिळण्याबाबत शासनास प्रस्ताव पाठवावा, असे अध्यक्षांनी निर्देश दिले आहेत. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|
| | श्री. दिपक नर्थेसिग गिरासे, पोलीस हवालदार क्रमांक ४०४/ रा. रा. पो. बल, गट क्र. ११ , नवी मुंबई<br><br>**अपोमसं, रारापोबल, म.राज्य, मुंबई व कार्यासन क्रमांक ०६** | **मुद्दा क्रमांक १८** शासन निर्णय दिनांक ०६.०८.२०१५ अन्वये पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना साप्ताहिक सुट्टीच्या मोबदल्यात देण्यात येणाऱ्या दैनिक भत्त्यामध्ये वाढ करुन एक दिवसाचे वेतन दैनिक भत्ता म्हणून देण्यात आलेले आहे. परंतू, साप्ताहिक सुट्टीची कमाल मर्यादा एका कॅलेंडर वर्षात केवळ ८ दिवस इतकीच ठेवलेली आहे. परंतू, राज्य राखीव पोलीस बलातील अधिकारी/कर्मचारी हे कायदा व सुव्यवस्था बंदोबस्ताकरिता सतत बाहेर तैनात असतात. तसेच नक्षल बंदोबस्ताकरिता सहा महिने बाहेर ड्युटी करीत असतात त्याठिकाणी साप्ताहिक सुट्टी घेता येत नाहीत. तरी पोलीस कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये, याकरिता सदरचा ०८ दिवसाचा कालावधीचा नियम राज्य राखीव पोलीस बलासाठी शिथील करण्यात यावा. | शासन निर्णय दिनांक ०६.०८.२०१५ अनुसार साप्ताहिक सुट्टीचा मोबदला देण्यासंदर्भात शासनाने साप्ताहिक सुट्टीची कमाल मर्यादा एका कॅलेंडर वर्षात ८ दिवस इतकीच ठेवलेली आहे.<br>राज्य राखीव पोलीस बलातील कंपन्या कायम आंतर सुरक्षा बंदोबस्तासाठी गट मुख्यालयाबाहेर तैनात रहात असल्याने त्यांना साप्ताहिक सुट्टी दिली जात नाही. तथापि, नवीन शासन निर्णयाप्रमाणे मिळणारा मोबदला हा जास्त असल्याने सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांना ८ दिवसांपेक्षा जास्त साप्ताहिक सुट्टी देण्यात यावी, असे निर्देश सर्व समादेशक यांना या कार्यालयाचे ज्ञापन दिनांक २०.१०.२०१५ अन्वये देण्यात आले आहेत. | **चर्चेनंतर सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| | श्री. दिपक नर्थेसिग गिरासे, पोलीस हवालदार क्रमांक ४०४/ रा. रा. पो. बल, गट क्र. ११ , नवी मुंबई<br><br>**कार्यासन क्रमांक २८-अ** | **मुद्दा क्रमांक १९** गट क्र. ११ हा कल्याण, डोंबिवली शहरापासून १८ ते २० कि.मी. अंतरावर असून नवी मुंबई, खारघरपासून १४ ते १५ कि.मी.अंतरावर आहे. गटातील १७० शासकीय निवासस्थानातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना जीवनावश्यक वस्तु खरेदीसाठी नवी मुंबई व ठाणे शहर येथील सबसीडी कॅन्टीनमध्ये जावे लागते. तसेच, गटातील कंपन्या विविध ठिकाणी बंदोबस्ताकरीता असल्याने कर्तव्य सोडून कुटुंबियांकरीता येणे शक्य होत नाही. या सर्व अडचणींमुळे गट क्र. ११, नवी मुंबई येथे सबसिडीअरी कॅन्टीन सुरु करण्यात यावी. | याबाबत सर्व धटक कार्यालयाकडून प्रस्ताव मागविण्यात आले असून, १२ घटक कार्यालयांनी सबसिडिअरी कॅन्टीनची आवश्यकता असल्याचे कळविले आहे. त्यावर कार्यवाही चालू असून, वरिष्ठांचे आदेश घेऊन त्याबाबतचा केंद्र शासनास प्रस्ताव पाठवून तो मंजूर करुन घेण्यात येईल. | प्रस्तुत प्रकरणी राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ११, नवी मुंबई येथे सबसिडीअरी कॅन्टीन सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याबाबत समादेशक यांना कळविण्यात यावे. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|
| | श्री.रविंद्र बळीराम दामोदर, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, अकोला.<br><br>**कार्यासन क्रमांक ०५ व ३०** | **मुद्दा क्रमांक २०** महाराष्ट्र राज्यामध्ये बरेच ठिकाणी पोलीस प्रशिक्षण केंद्रे व खातेअंतर्गत काही असे विभाग आहेत की ज्याठिकाणी स्थानांतर झालेनंतर एक टप्पा पदोन्नती देण्यात येते. तसेच, खाते अंतर्गत पोलीस उपनिरीक्षक पदाची परीक्षा घेण्यात येते व निकाल हा एकाच वेळी लावण्यात येवून रिक्त पदांचा गरजेप्रमाणे कर्मचाऱ्यांना अधिकारी पदावर टप्प्याटप्प्याने पोस्टींग देण्यात येते.<br>एक टप्पा पदोन्नतीच्या ठिकाणी व खाते अंतर्गत परीक्षेनंतर पोलीस उपनिरीक्षक पदी ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची पोस्टींग जुलै महिन्यात करण्यात येते अशांना नियमित वेतन वाढ न देता त्या ठिकाणच्या पदाच्या मूळ वेतनावर कायम करण्यात येते. ज्यामुळे त्यांना एक वेतनवाढ कमी मिळते. कारण एकाच बदली / स्थानांतर आदेशामधील व एकाच पोलीस उपनिरीक्षक पदांच्या निकाल यादी मधील अधिकारी / कर्मचाऱ्यांना जुलै महिन्या ऐवजी पुढील काळात पदोन्नती किंवा बदली कारणाने मोकळीक केले असता, अशांना ते बदलीवर सुटण्याअगोदर आहे त्या ठिकाणी नियमित वेतन वाढ देण्यात येते व एक टप्पा पदोन्नतीच्या ठिकाणी व पोलीस उपनिरीक्षक पदाच्या ठिकाणी हजर झाल्यानंतर त्यांना त्या ठिकाणच्या पदावर वेतन निश्चिती करण्यात येते.<br>ज्यामुळे जुलै महिन्यात हजर होणारे अधिकारी / कर्मचाऱ्यांना त्यांच्यानंतर त्याच सारख्या पदावर हजर होणारे अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये कमी जास्त फरक दिसून येतो. | **का.क्र. ३०** महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित नियम) नियम-२००९ वित्त विभाग, अधिसुचना दिनांक २२.०४.२००९ नुसार सर्व शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा महिना म्हणून हा त्या-त्या वर्षाचा जुलै महिना निश्चित करण्यात आलेला आहे. त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांना माहे जुलै महिन्यात वेतनवाढी देण्यात येतात.<br>याठिकाणी एखाद्या कर्मचाऱ्यांस (पोलीस उपनिरीक्षक पदावर) माहे जुलै नंतर पदोन्नतीच्या ठिकाणी कार्यमुक्त केल्यास तो कर्मचारी पदोन्नती ठिकाणी ज्या वेळी हजर होईल, त्यावेळी त्यांची पदोन्नतीच्या पदावर वेतननिश्चित होणे आवश्यक आहे. तसेच, जर एखादा कर्मचारी ज्या ठिकाणी एक टप्पा पदोन्नती वर आहे. त्या ठिकाणी जुलै महिन्यानंतर देखील हजर झाला असेल, तरी त्या कर्मचाऱ्याचे त्या पदावर वेतननिश्चिती होणे आवश्यक आहे. सध्या बऱ्याच पदांची वेतनश्रेणी एकच असून विविध पदासाठी वेगवेगळे ग्रेड पे आहे. जर पदोन्नतीचे पद असेल तर त्या पदासाठी असलेल्या ग्रेड पे नुसार त्या कर्मचाऱ्याची वेतन निश्चित होणे आवश्यक आहे.<br>जर एखाद्या कर्मचाऱ्याची पदोन्नती ठिकाणी वेतननिश्चित केली गेली नसल्यास सदर बाब हि त्या कर्मचाऱ्यांनी संबंधीत घटक प्रमुखांच्या नजरेत आणून देणे आवश्यक आहे. तसेच जर पदोन्नतीवर एखाद्या कर्मचाऱ्याची बदली झाल्यास, त्यास संबंधीत घटक प्रमुखांनी तात्काळ कार्यमुक्त करणे गरजेचे आहे. तसेच जर एखादा वरिष्ठ कर्मचारी हा कनिष्ठ कर्मचाऱ्यापेक्षा कमी वेतन घेत असल्यास त्या कर्मचाऱ्याचे वेतन वित्त विभाग, अधिसूचना दिनांक २२.०४.२००९ मधील नियम ७ टिप ५ पोटनियम (१) अन्वये वेतन निश्चित करता येईल.<br>**त्यामुळे सदरचा मुद्दा बैठकीमधील चर्चा / विचाराअंती निकाली काढण्यात यावा.**<br>**का.क्र. ५-अ** पोलीस प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षकांना प्रोत्साहन म्हणून एक टप्पा पदोन्नती देण्याबाबत महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्रमांक पीएए-०३९६/सीआर-४७६/पोल ५ (अ), दिनांक २०.११.१९९९ नूसार एक टप्पा पदोन्नती देण्यात येत होती. परंतु गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक पोलीस-१८१५/प्र.क्र.५४/पोल ५ (अ), दिनांक ०९.११.२०१५ अन्वये प्रोत्साहन पर एक टप्पा पदोन्नती देण्याची सवलत रद्द करण्यात आली आहे. राज्याच्या नवीन धोरणानूसार पोलीस प्रशिक्षण संस्थेतील जे अधिकारी/कर्मचारी प्रतिनियुक्तीवर त्या संस्थांमध्ये कार्यरत असतील, त्यांना ३०% प्रशिक्षण भत्ता देय ठरेल. तसेच या संस्थांमधील जी पदे प्रशिक्षण देणारी नाहीत, त्यांना मात्र ३०% प्रशिक्षण भत्ता देय ठरणार नाही. सदर प्रशिक्षण भत्ता मूळ वेतन + ग्रेड वेतन यावर देय राहील.<br>**त्यामुळे सदरचा मुद्दा बैठकीमधील विचारांती निकाली काढण्यात यावा, हि विनंती.** | प्रस्तुत प्रकरणी एकटप्पा पदोन्नती व खाते अंतर्गत पोलीस उपनिरीक्षक पदी अधिकारी / कर्मचाऱ्यांना नेमणूक देतांना ३० जून च्या आत नेमणूकीच्या ठिकाणी कार्यमुक्त करण्याबाबत चे अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|
| | श्री.नरसिंह तुकाराम शेरखाने, सहायक पोलीस आयुक्त (मुख्यालय), विशेष शाखा-१, गु.अ.वि., मुंबई.<br><br>**कार्यासन क्रमांक ०३** | **मुद्दा क्रमांक २१** पोलीसांना एका वर्षात एकुण १२ नैमित्तीक रजा देण्यात येतात. नैमित्तीक रजा या हक्काच्य रजा नाहीत.<br>पोलीसांनी कोणत्याही सणाचे दिवशी त्याच प्रकारे सरकारी सुट्ट्या उपभोगता येत नाहीत. या सुट्ट्या त्यांना देय नाहीत. इतर सर्व शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना ह्या सर्व सुट्ट्या उपभोगायला मिळतात. या सर्वांना ८ नैमित्तीक रजा देय असतात.<br>जेव्हा पोलीस (अधिकारी किंवा कर्मचारी) नैमित्तीक रजेसाठी अर्ज करतो. त्यावेळेस त्यांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे प्रत्येक वेळी रजा दिली जात नाहीत. याचे अनेक परिणाम होतात.<br>रजा न मिळाल्यामुळे त्यांच्यात नैराश्य उत्पन्न होते. त्यांना त्यांचे सोबत परगावी जाता येत नाही. त्यांना त्यांचेबरोबर राहता येत नाही. एखाद्या नातेवाईकांकडडील समारंभ, जसे, लग्न, वास्तुशांती, साखरपुडा, इतर धार्मिक कार्य इत्यादी यामुळे नातेवाईक यांचेमध्ये राग उत्पन्न होतो व अनेक वेळा नातेवाईकांशी असे झाल्यास सर्व नातेवाईक, नातेसंबंध कमी करतात व पोलीसांकडील कार्यक्रमांस येत नाहीत किंवा कालांतराने आमंत्रण सुध्दा देत नाहीत. अशामुळे त्यांचे नातेसंबंध तुटतात किंवा बिघडतात.<br>रजा न दिल्यामुळे पोलीसांकडे रुग्णनिवेदना शिवाय पर्याय राहत नाही व ते रुग्णनिवेदन करतात. त्यामुळे एक दोन दिवसासाठी जया कामासाठी रजा हवी असते त्यांऐवजी ते १० ते १५ दिवस कामावर येत नाहीत. त्यामुळे ते ज्या घटकात काम करतात त्या घटकाचे कामकाजावर विपरित परिणाम होतो.<br>रजा बंदीचे आदेश नसतांना व पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध असतांना देखील मागणी केलेल्या रजेच्या कालावधी कमी करुन रजा मंजूर केली जाते. अशावेळी रजेच्या कालावधीत काही गोष्टींबद्दल आणखी केले असेल तर सर्व आखणी | राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्याची जबाबदारी ही सर्वस्वी पोलीस दलाची आहे. त्यामुळे सणवार, उत्सव या काळात पोलीसांच्या रजांना सरसकट बंदी घालणे आवश्यकतेनुसार गरजेचे ठरते. तसेच, नैमित्तीक रजा या हक्काच्या रजा नाहीत. संबंधीत घटक प्रमुख हे त्यांच्या घटकातील कार्यरत पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची संख्या, व त्यांच्यावरील कामाचा ताण यांचा सारासार विचार करुनच पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या रजेच्या मंजूरीचा निर्णय घेत असतात. त्यामुळे सणवार, उत्सव या काळात प्राधान्याने कायदा व सुव्यवस्थेचा विचार होवूनच पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना रजा मंजूर करणे क्रमप्राप्त ठरते.<br>रजा बंदीचे आदेश नसताना व पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध असताना संबंधीत घटक प्रमुख संबंधीत पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे रजाविषयक निर्णय यथायोग्यपणे घेत असतात. त्यामुळे नैमित्तीक रजा न मिळाल्याने पोलीस अधिकारी व कर्मचारी हे रुग्णनिवेदन करतात, ही बाब वास्तुस्थितीस धरुन नाही.<br>रजा बंदीच्या बाबतीत विशेष शाखेला वगळण्यासंबंधी मागणी सुध्दा उचित नाही. कारण कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी विशेष शाखांचा (जसे SB/DSB,HQ) सुध्दा महत्वपूर्ण सहभाग असून तयांना रजा बंदीतून वगळल्यास कायदा व सुव्यवस्थेसंबंधी अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१, मधील नियम ६३ (६) मधील विहीत तरतूदीनुसार असाधारण रजा (विनावेतन) करण्यात येते. तसेच प्रचलित शासन नियमांनुसार "रजा" हा हक्क होत नाही. | १ जानेवारी ते ३१ डिसेंबर कॅलेंडर वर्षामध्ये प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या समस्या विचारात घेऊन कर्मचाऱ्यास १५ दिवस रजा उपभोगता येईल याबाबत सर्व घटक प्रमुखांना सूचित करण्याबाबत अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|
| | | बारगळते व असा अनुभव परत येवून आपली पत्नी, मुले, नातेवाईक यांचा हिरमोड होवू नये,म्हणून पुढील वेळेस रुग्णनिवेदन अथवा गैरहजर राहण्याचा पर्याय निवडतात. त्यामुळे संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांची प्रतिमा वरिष्ठांसमोर एक कामचुकार व्यक्ती अशी होते. ह्या सर्वांना परिणाम कार्यालयीन संबंधांमध्ये ताण निर्माण होण्यास होतो जो टाळता येवू शकतो.<br>जर पोलीसांना त्यांनी विनंती व मागणी केल्याप्रमाणे रजा देण्यात आल्या तर कमी पोलीस गैरहजर / रुग्ण रजेवर जाणार नाहीत.<br>तसेच सणाचे वेळी सरसकट रजेवर बंदी न घालता किंवा किंवा ठराविक घटकांकरीता पोलीसांचे रजेवर बंदी घातल्यास गैरहजर राहणे किंवा रुग्ण रजेवर जाणेचे प्रमाण अत्यंत कमी होईल. तसेच, पोलीसाला कुटुंबातून, नातेवाईक, मित्रमंडळ समाजातून वगळण्याची वैयक्तीक भवना, नातेवाईक मित्र मंडळातून कमी होवून व पोलीसांमध्ये नैराश्याची स्थिती कमी होईल. त्याचा चांगला परिणाम पोलीसांचे कामकाजावर, त्यांचे वैयक्तीक स्वभावावर होईल.<br>रजा बंदच्या बाबतीत विशेष शाखेला वगळण्यात यावे. आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची अगोदर कामकाजाकरीता नेमणूक केली जाते. त्यामुळे ज्यांची आवश्यकता नुकताच सरकारने पोलीसांच्या साप्ताहिक सुट्टीचा पारीत केलेला शासन निर्णय क्रमांक पीएए-०३९८/प्र.क्र.८५/पोल-५ अ, दिनांक ०६.०८.२०१५ अन्वये त्यांना रजेचा मोबदला द्यावयास लागेल. जर त्याने साप्ताहिक सुट्टी भोगली तर ते रजेच्या पुढील आठवड्यात मानसिक व शारीरिक दृष्ट्या जास्त काम करतील.<br>जे पोलीस अधिकारी / कर्मचारी वैद्यकिय कारणास्तव अनुपस्थित रहातात. त्यांची अनुपस्थिती विनावेतन केली जाते. विनावेतन करण्याचे कोणत्या नियमान्वये करण्यात येते. | | |

# ४७व्या राज्यस्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेसाठी सभासद नसलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद नसलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|
| १. | पोलीस अधीक्षक, नांदेड<br><br>**का. क्र. २७-ब.** | **मुद्दा क्रमांक १ :-** पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचे आत्तापर्यंत बांधकाम केलेली शासकीय निवासस्थाने हे जुन्या वेतनश्रेणीनुसार बांधण्यात आलेली आहेत. यापुढील नवीन बांधकाम होणारी शासकीय निवासस्थाने ही सुधारीत वेतनश्रेणीनुसार बांधकाम करण्यात यावीत. तसेच प्रत्येक वर्षी नवीन पोलीस भरती होत आहे. परंतु, त्यानुसार शासकीय निवासस्थान बांधली जात नाही. त्यामुळे पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना शासकीय निवासस्थाने मिळत नाहीत. सुधारीत मंजूर संख्याबळाप्रमाणे शासकीय निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात यावीत. | पोलीसांसाठी बांधण्यात येणारी घरे ही शासन धोरणानुसार मोठी निवासस्थाने बांधण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. ज्यामध्ये मोठी डायनिंग रुम, किचन, २ बेडरुम व स्नानगृह अशी साधारणत: ४७५ चौ.फुटाची निवासस्थाने बांधकाम खामगांव, नवी मुंबई, घाटकोपर इत्यादी ठिकाणी सुरु झालेली आहेत.<br>सदर निवासस्थाने ही घटकांच्या मंजूर संख्याबळाच्या किमान ८० टक्के इतकी बांधण्यात येणार असून पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. | पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना किती शासकीय निवासस्थानांची आवश्यकता आहे, याबाबतची माहिती सर्व घटक प्रमुखांकडून मागवून, त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा. |
| ३. | श्री.के.एम.सनांसे, पोहवा/२०२७, औरंगाबाद शहर<br><br>**का. क्र. ०६.** | **मुद्दा क्रमांक २:-** चांगल्या कामगिरी / सेवा / शेरे बाबत आगावु वेतन वाढ मिळत असलेली सेवा सहाव्या वेतन आयोगात बंद करण्यात आली आहे, ती पुन्हा सुरु करणेस विनंती. | शासन, गृह विभाग पत्र क्रमांक रापोसे-२२०९ / प्र.क्र.४१० / पोल-१ अ, दिनांक १७.०३.२०१२ अन्वये अन्युत्कृष्ट कामगिरीबद्दल आगावू वेतनवाढी देण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडून आदेश शासनाकडून निर्गमित होतील असे कळविले आहे. त्याअनुषंगाने शासनाकडून अद्यापही कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत. | **चर्चेनंतर सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद नसलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|
| ३. | श्री.के.एम.सनांसे, पोहवा/२०२७, औरंगाबाद शहर<br><br>**<u>का. क्र. ५.</u>** | **<u>मुद्दा क्रमांक ३:-</u>** पोलीस शिपाई, पोलीस नाईक, पोलीस हवालदार, सहायक पोलीस उपनिरीक्षक यां प्रमाणे पदोन्नती दिली जाते, ती वाढवून पोलीस उपनिरीक्षक पदापर्यंत देण्यात यावी. | पोलीस उप निरीक्षक (नि:शस्त्र) ही पदे शासन निर्णय क्रमांक पीएसबी-०३९०/सीआर-४०८/पोल-५ अ, दिनांक ०५.०७.१९९४ अन्वये खालील प्रमाणे भरण्यात येतील.<br>अ) सरळसेवेने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरतीने - ५०%<br>ब) विभागांतर्गत उमेदवारांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत परीक्षा घेऊन सरळसेवा भरती - २५%<br>क) पोलस हवालदार म्हणून ज्यांनी ५ वर्षे सलग सेवा अगर ७ वर्षे खंडीत सेवा केली आहे. त्यांची खांत्यांतर्गत पात्रता परीक्षा घेऊन तया परीक्षेतील गुणवत्ता क्रमानुसार पदोन्नती - २५%<br>पोलीस उपनिरीक्षक (नि:शस्त्र) ही पदे उपरोक्त शासन निर्णयानुसार भरण्यात येत असल्याने सदरची बाब या कार्यालयाच्या अधिपत्याखाली येत नाही. | घटकांत रिक्त असलेल्या पदांचा व सेवानिवृत्तीने रिक्त होणाऱ्या पदांची पदनिहाय यादी प्रत्येक महिन्यांत तयार करुन सर्व घटक प्रमुखांनी पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांची रिक्त असलेली पदे पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही वेळीच करावी. |

# ४७व्या राज्यस्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेसाठी सभासद असलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|
| १ | श्री.मारुती ज्ञानदेव मगदूम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, परि.४, विशा.१, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई.<br><br>**कार्यासन क्रमांक २८-अे** | **मुद्दा क्रमांक १ :-** सैनिकांच्या कल्याणाच्या दृष्टीने करण्यात आलेल्या सैनिक वेल्फर बोर्डाची स्थापना, तसेच कार्यपध्दती संबंधांने आढावा घेवून त्याअनुषंगाने पोलीस वेल्फेर बोर्डाची स्थापना करणे व त्याप्रमाणे अंमलबजावणी व्हावी, यादृष्टीने आवश्यक तो पाठपुरावा होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही होण्याबाबत याद्वारे विनंती करण्यात येत आहे. | **चर्चेनंतर सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| २ | श्री.मारुती ज्ञानदेव मगदूम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, परि.४, विशा.१, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई.<br><br>**कार्यासन क्रमांक २८** | **मुद्दा क्रमांक २ :-** शासकीय कर्मचाऱ्यांपैकी केवळ पोलीस यंत्रणेतील अधिकारी व अंमलदार हे अहोरात्र कर्तव्याकरीता बांधील आहेत. तसेच गरजेच्या तुलनेत अत्यंत अपुरे मनुष्यबळ व पोलीस यंत्रणेच्या कामकाजामध्ये दिवसेंदिवस होत असलेली भरमसाठ वाढ त्यामुळे वाढणारा कामाचा बोजा तसेच प्रतिकुल परिस्थितीत सातत्याने तणावाखाली करावे लागणारे काम, सेवेच्या कालावधीतील अनियमितता, प्रदिर्घकाळ प्रतिकुल परिस्थितीत कर्तव्य बजाविणाऱ्या पोलीसांना सेवानिवृत्तीच्या काळात अनेक असाध्य, तसेच दुर्धर आजार, कित्येक प्रसंगी विकलांगता / अपंगत्व, अकाली मृत्यु इत्यादी गंभीर समस्यांचा सामना करावा लागतो. सेवानिवृत्तीच्या कालावधीत तर तुटपुंज्या पेन्शनमध्ये व वर नमुद केल्याप्रमाणे अनेक गंभीर समस्यांचा सामना करणे अशक्यप्राय होते.<br>पोलीस कर्मचाऱ्यांनी वर नमुद केल्याप्रमाणे दिर्घकाळ प्रतिकुल परिस्थितीत केलेले खडतर परिश्रम व त्यामुळे सेवानिवृत्तीच्या नाजुक परिस्थितीच्या काळात वर नमुद केल्याप्रमाणे निर्माण होणाऱ्या गंभीर समस्यांचा गांभीर्यपूर्वक विचार होवून विशेष बाब म्हणून पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांना सेवानिवृत्तीनंतरही महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेचा लाभ व्हावा यादृष्टीने शासनाकडे आवश्यक ता पाठपुरावा सचोटीने करणे संयुक्तीक होईल. | शासन निर्णय वित्त विभाग क्र. संकीर्ण - २०१४ / प्र.क्र.४० / २०१४ / कोषा-प्रशा-४, दिनांक ०९.०७.२०१४ अन्वये "कार्यरत व सेवानिवृत्त राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी आणि अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांच्याकरिता वैद्यकिय प्रतिपूर्तीची विमाछत्र योजना" लागू करण्यात आली असल्याने, **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|
| ३. | श्री.मारुती ज्ञानदेव मगदूम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, परि.४, विशा.१, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई.<br>**कार्यासन क्रमांक ९** | **मुद्दा क्रमांक ३ :-** पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह प्रदान करण्यासाठी निवड करतांना एकुण बक्षीसांची संख्या, गुणवत्ता, सेवाकाल, सातत्यपुर्ण सचोटी इत्यादी बाबींचा व्यवहार दृष्टीकोनातून सारासार विचार व्हावा. १५ वर्षापूर्वीच्या कालावधीतील शिक्षा विचारात घेवू नयेत. | **प्रस्तुत प्रकरणी विचार करण्यात येईल, असे अध्यक्षांनी सूचित केले आहे.** |
| ४. | श्री.मारुती ज्ञानदेव मगदूम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, परि.४, विशा.१, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई.<br>**कार्यासन क्रमांक ९** | **मुद्दा क्रमांक ४ :-** मा.पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह विजेते धारकांना एक वेतनवाढ लागु करावी, त्यांना प्रमाणपत्रे / प्रशस्तीपत्रे प्रदान करण्यात यावी. | सन्मानचिन्ह विजेते धारकांना फक्त प्रशस्तीपत्र देण्यात येतील , असे मा.अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| ५. | श्री.मारुती ज्ञानदेव मगदूम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, परि.४, विशा.१, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई.<br>**कार्यासन क्रमांक २८-अे** | **मुद्दा क्रमांक ५ :-** सबसिडीअरी कॅन्टीन व्यवस्थापक अधिकारी सक्षम असावा. विविध मालाची गुणवत्ता, उदा. ॲगमार्क, आयएसआय मार्क, कंपनीचा लौकीक, मालाची गुणवत्ता, बाजारात वस्तुंच्या गुणवत्ता तसेच किंमतीसंबंधाने जाणकार असावा. किमान कॉमर्स ग्रॅज्युएट असावा. | **चर्चेनंतर सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| ६. | श्री.मारुती ज्ञानदेव मगदूम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, परि.४, विशा.१, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई.<br>कार्यासन क्रमांक २७-ब | **मुद्दा क्रमांक ६ :-** पोलीसांना घरासंबंधाने शासनाकडून अनुदान उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून अलिकडील काळातील पंतप्रधान आवास योजना अंतर्गत तसेच, अन्य शासनाच्या योजनेतून अनुदान उपलब्ध करुन देण्याचेदृष्टीने शासनाकडे प्रयत्न व्हावेत. | **चर्चेनंतर सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| ७. | श्री.एस.आय.अली, पोलीस निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ६, धुळे<br>**कार्यासन क्रमांक २३** | **मुद्दा क्रमांक ७ :-** विविध गुन्ह्यात जमा करण्यात आलेली शस्त्रे, रिक्त पुंगळ्या व इतर शासकीय मुद्देमाल लवकरात लवकर परत मिळावा, | विविध गुन्ह्यात जमा करण्यात आलेली शस्त्रे, रिक्त पुंगळ्या व इतर शासकीय मुद्देमालबाबत न्यायालयीन खटला प्रलंबित असतांना, जप्त करण्यात आलेली शस्त्रे, रिक्त पुंगळ्या व इतर शासकीय मुद्देमाल परत प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधीत घटक प्रमुखांनी संबंधीत न्यायालयाकडे पत्रव्यवहार करण्यास सूचित केले. तसेच, अपर पोलीस महासंचालक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सर्व घटक प्रमुखांकडून याबाबतचा आढावा घ्यावा, |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|
| ८. | श्री.एस.आय.अली, पोलीस निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ६, धुळे **कार्यासन क्रमांक ६** | **मुद्दा क्रमांक ८ :-** भारत राखीव बटालियन-II येथील चालकाचे पद भरलेले नाही. | **प्रस्तुत प्रकरणी शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल.** |
| ९. | श्री.एस.आय.अली, पोलीस निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ६, धुळे **कार्यासन क्र.२०** | **मुद्दा क्रमांक ९ :-** राज्य राखीव पोलीस बलाच्या कंपन्या बंदोबस्तास तैनात असतांना बंदोबस्त दरम्यान स्थानिक पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना विभागाची माहिती असल्याने बंदोबस्त अंतिम करतेवेळी राज्य राखीव पोलीस बलाच्या कंपन्यांची प्रथमत: रवानगी करावी, व स्थानिक विभागातील पोलीस अधिकाऱ्यांना हजर राहण्याबाबत कळविण्यात यावे. | प्रस्तुत प्रकरणी बंदोबस्त संपल्यानंतर स्थानिक पोलीस अधिकरी / कर्मचाऱ्यांसोबतच राज्य राखीव पोलीस बलाच्या बंदोबस्तावरील कंपन्यांना देखील मोकळीक करण्याबाबत सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येईल. |
| १० | श्री.एस.आय.अली, पोलीस निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ६, धुळे **कार्यासन क्रमांक ३०** | **मुद्दा क्रमांक १० :-** राज्य राखीव पोलीस बलाची कंपनी विशिष्ट ठिकाणी तैनात असतांना, कंपनीकरिता उपलब्ध असलेल्या वाहनाचा चालक रजेवर असल्यास, त्यादरम्यान कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्न उपस्थित झाल्यास, त्वरीत चालक उपलब्ध होणे आवश्यक असल्याने, रजेवर असलेल्या वाहन चालकास उपस्थित रहावे लागते. याकरिता या रजेच्या कालावधीची रजा पुढच्या साप्ताहिक सुट्टीस जोडुन देण्यात यावी. | प्रस्तुत प्रकरणी अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सूचना देण्याबाबत, अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत. |
| ११ | श्री.एस.आय.अली, पोलीस निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ६, धुळे **कार्यासन क्रमांक १८** | **मुद्दा क्रमांक ११:-** गणवेशामधील एकसूत्रीपणा येण्यासाठी एकाच ठिकाणी गणवेशाचा कपडा उपलब्ध करुन देण्यात यावा. | प्रस्तुत प्रकरणी सबसिडीअरी कॅन्टीन, मुंबई द्वारे ऑनलाईन खरेदीची नोंदणी पध्दत उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करावी. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|
| १२ | श्री.सादिक अकबर पठाण, पोलीस उपनिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, नागपाडा, मुंबई **अपोमसं, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई** | **मुद्दा क्रमांक १२ :-** सध्याचे पोलीस वाहन चालक हे प्रशिक्षित असल्याने, ते ठराविक कालावधीनंतर पोलीस कार्यकारी दलामध्ये बदली होवून जातात. याकरिता, पोलीस वाहन चालक पदाकरिता शैक्षणिक पात्रता दहावी (S.S.C.) उत्तीर्ण करावी. | प्रस्तुत प्रकरणी विचार चालू असल्याचे अध्यक्षांनी सांगितले. |
| १३ | श्री.सादिक अकबर पठाण, पोलीस उपनिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, नागपाडा, मुंबई **कार्यासन क्र.३ व ५** | **मुद्दा क्रमांक १३ :-** वाहनांची संख्या वाढल्याने जिल्ह्याच्या ठिकाणी पोलीस उपनिरीक्षक पेक्षा पोलीस निरीक्षकांची पदे भरण्याबाबत. | पोलीस निरीक्षकांची पदे भरण्याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, पुणे यांना कळविण्यात यावे. |
| १४ | श्री.मनोज बाबुराव सावंत, पोह/५८२७, ठाणे शहर **कार्यासन क्रमांक ३०** | **मुद्दा क्रमांक १४ :-** पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना किरकोळ रजेवर किती प्रमाणात सोडले जावेत. | पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या रजांचा विचार करुन, रजेवर जाणाऱ्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांची संख्या १०% जास्त असता कामा नये. |